
अंक ४ था.] वर्ष २५ वें]

# "श्री साईलीला"

त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २५ ] त्रैमासिक – डिसेंबर १९४८ [ अंक ४ था

## –: संपादकीय :–

ह्या अवनीतलावर असा एकहि प्राणी नाहीं व असा एकहि रजःकण नाहीं, किंवा जें बुद्धीनें आकळितां येईल असें एखादें रितें स्थळहि नाहीं कीं जेथें श्रीसाई (परमात्मा) स्वरूपाची व्याप्ति नाहीं.

श्रीसद्गुरु साईबाबा हे ब्रह्मांडांत अजरामर झाले आहेत. त्यांच्या लीलेचें कौतुक आम्ही सामान्य मानवप्राण्यानें करणें, त्यांचा स्वतःला आलेल्या गोड अनुभवाचा आनंद भोगून तो 'साईलीला' त्रैमासिकांत प्रसिद्धीस पाठवणें सर्व साईभक्तांचें आद्य कर्तव्य आहे.

'साई लीलेला' ह्या अंकानें २५ वें वर्ष पुरें होईल. ऐन तारुण्याच्या जोमांत अगर 'गद्धे पंचविशींत' हें मासिक असल्यामुळें आपणांसारख्या अनुभविक थोरा-मोठ्यांच्या सहवासाची त्याला जास्त जरूरी आहे. नाहींतर हें बाळ जगाचा अनुभव नसल्यामुळें केर कचऱ्याच्या ढिगाऱ्यांत कोठें गडप होईल तें कळणारसुद्धां नाहीं. तरी आपण सर्वांनीं ह्या बाळाला प्रेमानें आंजारून गोंजारून पुढें आणलेंच पाहिजे.

१९४८ ची दिपवाळी घरोघर झाली. लाडू, करंज्या खाण्यांत, गप्पा गोष्टी करण्यांत, सिनेमा नाटकें बघण्यांत आपला वेळ आनंदांत घालवलांत नाहीं ! असो.

नरक चतुर्दशीच्या दिवशीं सत्यभामेनें नरकासुराला मारला आहे. आणि म्हणून आपण त्या दिवशीं सकाळींच अभ्यंगस्नान करतों, व तुळशीकडे चिराटें खेटरांनीं फोडून त्याचा रस तोंडांत घालतों व नंतर फराळ वगैरे करून दिवाळीचा आनंद लुटतों.

आपण सर्वांनीं नरकासुराला—जो नरक आपल्या पोटांत आहे—द्वेष, मत्सर, वाईट विचार, आचार व कृति वगैरे वगैरे,—त्याला हद्दपार घालवून सत्याची ज्योत पेटवून गोड दिवाळीचा आनंद लुटा.

साई भक्तांनो, 'साई लीलेचा' फैलाव—जें सत्य आज शिरडींत आहे,—त्याच्या प्रभावाची सत्यता व तें सत्य टिकवण्याकरितां शत्रूंना न भितां, न डगमगतां, सत्य घडलेले प्रकार, अनुभव 'साई लीलें'त पाठवून द्या व असत्य उजेडात आणा. देहविकारांपासून त्रास होतो म्हणून दडून बसणें ही कमी दर्जाची पायरी व भित्रेपणा दाखवितां, तो आपणाला नको; आपण त्याशीं सामना करून ध्रुवबाळ जसा काळाच्या डोकीवर पाय देऊन अढळपदास पोंचला, तसेंच, शिरडींतील सत्याची ज्योत अखंड तेवत ठेवण्याकरितां आपण सर्वांनीं आपल्या मार्गांतील अडचणी-बरोबर झटापट करून तोंड दिलें नाहीं तर, शिरडींतील सत्य 'श्री साई' आपलीं तोंडें गोड कसें करील ! व साखरेचे खडे बळेंबळें आपल्या तोंडांत कसे कोंबील !

"सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म । सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्वकाळ तिष्ठत"

शिरडीग्रामीं 'सत्यसाई' भक्ताकरितां सकाम होऊन प्रगट झाला व दुष्टांचा, दुराचारांचा व असत्याचा नायनाट करण्याकरितां शिरडी क्षेत्रीं वास करून राहिला. पुंडलिकानें जसा विठोबाला पुंढरपुरास उभें केलें, तसेंच, भक्तांनीं आपल्या प्रेम-रज्जूनें, साईस शिरडींत बांधून ठेवलें.

सत्यः म्हणजे जें सद्धर्माला धरून असतें व वाणीनेंहि तसेंच बोललें जातें तें सत्य. सत्य राखण्यांत राजा हरिश्चंद्र, नळ, धर्मराज, इत्यादि श्रेष्ठ विभूतींनीं अश्रुतपूर्व हालअपेष्टा भोसल्या; सत्य हाच खरा मानवाचा धर्म आहे व तो टिकव-ण्यांतच खरा पुरुषार्थ आहे.

सत्य स्वरूपाचा विचार केला तर परब्रह्म आणि सत्य याचें एकच रूप आहे. केवळ वाणीनेंच सत्य बोलणें सत्य होणार नाहीं. किंवा वाणीनें बोललेलें असत्याहि सत्य ठरेल. जसें एखादी गाय खाटकाचे हातून निसटून गल्लींत शिरली हें आपणांला माहित आहे तरीसुद्धां खाटक्याकडे सत्य गोष्ट सत्य म्हणून बोलतां येणार नाहीं. (२) क्षयरोग्याला त्याला खरोखरीच क्षय असतांना तुला क्षय नाहीं असें सांगून औषधानें बरा झाला तर त्या वैद्याचें असत्य बोलणें सत्य ठरेल. म्हणून केवळ शब्दांच्या उत्तानार्थाकडे लक्ष देऊन सत्यासत्याचा निर्णय केला पाहिजे.

साईभक्तांनो, शिरडींतील सत्याचीं जोपासना करा, सत्यपालनानें पुष्कळ दुर्गुण जातात व अखेरीला सत्याचाच जय होतो.

अशा रीतीनें सत्याची कांस धरून चंद्रसूर्याप्रमाणें झळझळीत व्हा व आपला आनंद, आपली दिवाळी मनसोक्त करा, असत्याचरणानें मात्र आपलें दिवाळें काढून घेऊं नका.

सत्यमेव जयते ! सत्यमेव जयते, !! सत्यमेव जयते !!! हें त्रिवार सत्य आहे. पण निष्ठा पाहिजे.

**संपादक**

---

## " सुखासाठीं करिसी तळमळ। तरि तूं पंढरीशीं जाई एक वेळ ॥ "

चौऱ्यांशी लक्ष योनि फिरतां फिरतां काकतालीय न्यायानें अवचित ही नरतनु प्राप्त झाला असतां आपलें स्वतःचें हित किंवा अनहित करून घेणें हें मनुष्य प्राण्याच्या हातचें आहे. मनुष्य प्राणी हा केवळ सुखाचीच हांव धरतो व त्याकरितांच त्याची सर्व घडामोड व धडपड असते.

सुख आणि दुःख हीं आपल्याच पापपुण्याचीं फळें आहेत, मग तीं संचित वा क्रियमाण असोत, व तीं ज्याचीं त्यानींच भोगलीं पाहिजे.

सुख नाशिवंत व अविनाश अशा दोन प्रकारचें असल्यामुळें अज्ञानानें मनुष्य नाशिवंत सुखाच्याच म्हणजे इंद्रियांपासून जें सुख प्राप्त होतें अशा विषयांच्या पाठीमागें लागतो आणि हें सुख दुःखपर्यवसायी आहे. कारण विषय संपतांच सुख संपतें व दुःख प्राप्त होतें. त्या दुःखाच्या निवृत्तीकरितां ज्यांत आत्यंतिक, अविनाश सुख आहे त्याच्याच पाठीं लागून तें हुडकून काढण्याचा प्रयत्न प्रत्येक मानवानें करणें योग्य होईल.

ज्या सुखासि नाहीं अंत । तें सुख आहे हृदयांत ॥
सुख सुखाचिरे मिळणी । करूनि घेई आपुलें मनीं ॥
सुखें सुखा अनुभव । हाचि ब्रह्मविद्येचा भाव ॥
सुखें सुखाची मांडणी । शरण एका जनार्दनीं ॥

आत्म्याचें विस्मरण व जगताचें भान हीच माया. 'मा' नाहीं व 'या' जी. जी नाहीं ती म्हणजे अर्थात 'असत्,' अज्ञानाच्या योगानें खरी भासते व खऱ्या आत्मसुखाला मनुष्य पारांगत होतो. स्थूल, सूक्ष्म व कारण असे तीन देह आहेत. जागृत, स्वप्न, व सुषुप्ति अशा अवस्थाहि तीन आहेत. व रज, तम व सत्व असे तीन गुण आहेत.

संचित कर्म—म्हणजे अनेक जन्मांत भोगून शिल्लक राहिलेलें कर्म वासनारूपी बीजानें बुद्धींत रहातें व ह्या वासनेच्या योगानें सूक्ष्म देह मनाच्या मध्यस्थीनें बुद्धीला भ्रमण करून इंद्रियसुखाच्या मागें लागतो व दुःखाच्या दरींत पडतो.

कर्म करीत करीत कर्मानेंच कर्माचा नाश करून वासनाक्षय करणें हें मनुष्य-जन्माचें कर्तव्यकर्म समजावें. रजोगुण व तमोगुण हे वासनेच्या बीजाचें खत असल्यामुळें त्यांची ह्या देहांतून हकालपटी करून, ईश्वरभक्तीला पोषक असा सत्व गुण शिल्लक राहिला म्हणजे सुखाच्या मार्गांत पडलेला अहंकाराचा डोंगर चढून जाणें सोपें जाईल, व भक्तिमार्गांत मनाची एकाग्रता साधून खऱ्या सुखाचा अनुभव भोगण्यास मिळेल व ज्या सुखांत, चित्त आणि बुद्धि उल्हास पावते त्या सात्विक सुखाची चट लागून मनुष्य तीन्ही काळ आनंदी राहील.

विषय व इंद्रियें यांच्या संयोगानें जें सुख प्राप्त होतें तें राजस सुख, विषय संपतांच दुःखाच्या दरींत लोटतें. आरंभीं व शेवटीं मनाला मोह पाडणारी निद्रा, आळस व प्रमाद, यांच्या योगानें तामसी सुख प्राप्त होतें, व हें तामसी सुख नरकाला नेणारें असल्यामुळें त्याज्य होय.

वासनेचे खेळ मनाच्या मध्यस्थीनें असल्यामुळें मनाला ताब्यांत, किंबहुना नोकर करणें म्हणजेच खऱ्या सुखांचा मार्ग अवलंबन करणें होय.

ध्यान हें मन निवळण्याचें एक साधन होय. तें निर्मळ झालें कीं नाहीं हें पहाण्याचा ध्यान हा खरा आरसा आहे; स्वार्थ आणि परमार्थ दोन नाहींत. स्वार्थांत लक्ष नसलें म्हणजे जसा स्वार्थ बिघडतो, तसेंच ध्यान करीत असतां जर सावधानता नसेल तर मनोराज्य वाढेल, व हातीं धुपाटणें येईल.

परमशांतीचा आस्वाद घेण्याकरितां मनाला ईशसेवेकडे वळवून दृढ भावनेच्या जोरावर आत्मविश्वास संपादन करून घेण्याची जरूरी आहे. आत्मविश्वास हाच साक्षात् ईश्वर. आणि त्याकरितां ईश्वराचें श्री सद्गुरु साईंचें नामस्मरण उठतां बसतां, कामधंदा करितां, मनाच्या मनांत मुकाट्यानें करावें. म्हणजे वासनेच्या संगतीनें मनाला वाटेल तेथें भटकण्याची जी संवय लागली आहे ती मोडून मन स्थिर होईल व नंतर क्रमाक्रमानें बुद्धि स्थिर होईल व आत्मसुखाचा लाभ होईल.

नाम संकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरिचीं ॥
नलगे सायास जावे वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥
ठाईंच बैसोनी करा एक चित्त । आवडी हा अनंत आळवावा ॥
रामकृष्णहरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्व काळ ॥
यावीण आणीक नाहीं पैं साधन । वहातसे आण विठोबाची ॥
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनी । शहाणा तो धणी घेतो येथें ॥

अशा रीतीनें अखंड नामस्मरण, भजन पूजन, गीता, भागवत रामायण यांसारखे ग्रंथ पठन करून त्यांचे गुण आठवून त्यांना क्षणोक्षणीं मनानें वंदन, किंवा मूर्तीचें दर्शन घेऊन त्याला भक्तिभावानें आपलासा करून घेणें म्हणजेच मन ताब्यांत घेणें होय, त्याकरितां प्रपंच सोडणें नको, रानावनांत जाणें नको, गुहेंत बैसणें नको, अगर स्त्रीपुत्रांचा त्याग व पैसा खर्चहि करणें नको. संतूसंगती,

आचार विचार, मनोनिग्रह व निश्चय ह्यांच्या सहायानें मनाला बांधून ठेवतां येतें. ' मन एव मनुष्याणं कारणं बंधमोक्षयो: '

सात्विक आहार, सात्विक रहाणी व सात्विक विचार व आचार भक्तिमार्गाला पोषक आहेत. सत्वगुण ज्ञानमय निर्विकारी असून अविनाशी व आत्यंतिक सुखाची आसक्ति उत्पन्न करतो. मनुष्यानें कोणचेंहि कर्म करण्याचें मनांत आणलें, तरी तें कर्म कसें करावें हें बुद्धि सुचवीत असते व बुद्धीचा प्रेरक ईश्वर बुद्धीपलीकडे राहून सर्व सूत्रें हालवीत असतो. आपल्या कर्माप्रमाणें बुद्धि फिरत असते व बुद्धि सुचवील त्याप्रमाणें मनुष्याचे हातून कर्म घडत असतें. सत्कर्मांनीं बुद्धि सुसंस्कृत करून घेतां येते, किंवा दुष्कर्मांनीं बुद्धि मलीन होऊन मनुष्य अधोगतीला जातो, हेंच खरें सोवळें ओंवळें, कंबरेस रेशमी सोंवळें नेसून तास नी तास देवपूजेंत घालवले, पण मन सोंवळें नसेल तर त्याचा काय उपयोग ! वरून सोंवळें व आंतून ओंवळे असें होईल. तरी वरून पिशाच वृत्ति व आंतून शहाणा हेंच खरें सोंवळें आहे. नाहींतर तें ' मी ' कोणीतरी एक देवाचा भक्त आहे हें समजण्याकरितां दांभिकपणानें लोकांच्या डोळयांत धूळ घालण्यासारखें आहे.

( १ ) ऐसे केलें या गोपाळें । नाहीं सोंवळें ओंवळें ।।
कांटे केतकीच्या झाडा । आंत जन्मला केवडा ।।
फणसा अंगीं कांटे । आंत अमृताचे सांठे ।।
नारळ वरून कठीण । परी अंतरीं जीवन ।।
शेखमंहमद अविंध । त्याचे हृदयीं गोविंद ।।

( २ ) ऐसे कैसेरे सोंवळे । जें शिवतां होतसे ओंवळे ।।

ईश्वर अन्यायी मुळींच नाहीं, त्याच्या दरबारांत, गरीब श्रीमंत, लहान थोर असा भेदभाव नाहीं, तो ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें त्याला बुद्धि देतो व त्या प्रेरणेप्रमाणें मनुष्य सुखदुःख भोगतो. भेदभाव हा मनुष्याच्या कर्मांनींच केला आहे व तो स्वकर्मांनींच बद्ध आहे.

सेवा, प्रेम व भक्ति हीं नामें निराळीं असलीं तरी त्याचा मनोधर्म एकच आहे. आणि त्या मनोवृत्तीला ईश्वराच्या भक्तिभावाचा पाठिंबा असेल तर सुबुद्धी उत्पन्न होईल व अंतःकरणाच्या सरोवरांत, रजोगुणी व तमोगुणी लाटातरंग न उमटतां ते सात्विक गुणाच्या आधारें शांत शीतल राहील व आत्मसुख प्राप्त होईल.

विनाकारण पोटाकरितां, अगर मोठेपणाकरितां नामाचा गजर करणें व सोवळया ओंवळयाचा निर्बंध राखणें म्हणजे स्वतःची फसवणूक करणें आहे. प्रत्येक मानवांनीं स्वतः अनुभव घेऊन त्याचा फायदा दुसऱ्यास देणें जितकें श्रेयस्कर होईल तितकेंच भक्तीचें अवडंबर व विनाकारण अनुभवाशिवाय स्तोम माजविणें विघातक होईल.

अनुभवा वांचुनि सोंग संपादणें। नव्हे तें करणें स्वहिताचें ॥
तैसा नको भुलों बाहिरल्या रंगे। स्वहित तेची करूनि घे ॥
बहुरूपी रूपें नटला नारायण। सोंग संपादून जैसा तैसा ॥
कनक झाड म्हूण। वंदियलें माथा। परि तेहो अर्थी न मिळे मज ॥
पाषाणाचें नांव ठेवियलें देव। आणिका तारी भाव परि तो तैसा ॥
तुका म्हणे त्याचा भाव तरी त्यास। अहंभावी नाश तोची पावे ॥

भक्तिभावानें, प्रेमानें, शुद्ध आचरणानें स्वतःची शुद्धता करून आपलें हित साधा. आपण आपला धर्म सोडला म्हणून आपली शक्ति गेली व देव सोडला म्हणून आपली बुद्धि गेली. बुद्धि गेली कीं भांडवल जातें व भांडवल गेलें कीं सर्वच गेलें. म्हणून आधी बुद्धि जातें व मग भांडवल जातें. प्रापंचिक सुख हें ठराव करून मिळत नसतें. आपण दुसऱ्याला सुख दिलें तरच तें आपणाला मिळेल, अशी जेव्हां परस्परांत धर्मभावना जागृत होईल व ती टिकण्याकरितां आपण प्रथम दुसऱ्याला सुख देण्याचा प्रयत्न करूं तेव्हां तें आपणाला परत हक्कानें मिळेल. धर्मानें पातिव्रत्य राखतां येतें. पातिव्रत्यानें ईश्वरभक्ति साधतां येतें, ईश्वर भक्तीनें आत्मविश्वास उत्पन्न होतो व आत्मविश्वासानें असाध्यहि साध्य होतें.

साई भक्तांनो, सुखासाठीं पंढरपूर नको काशिविश्वेश्वर अगर बद्रिनारायण नको. नामस्मरणानें व भक्तिभावानें तें प्रपंचांत राहून घरींच मिळूं शकेल; भगिरथ प्रयत्न करणें आवश्यक आहे.

तुम्ही सारे अनुभवी एकत्र जमून, अनुभवाचा स्वयंपाक करा. शरीररूपी भांडें धुऊन, वाईट मनाचें चंचलपण हेंच खरकटें दूर करून, घर चांगल्या रीतीनें सारवून, तेथें त्रिगुण हेच तीन चुलीचे दगड मांडून, विरक्तीचें सोवळें नेसून, हरिभक्तीच्या पाण्याचें आधण ठेवून, ज्ञानाग्नी पेटवून मायेचें अज्ञान हींच काष्टें तीं आनंदानें जाळून, करुणेचे डाळ तांदूळ हींच सामुग्री जमवून, मोक्षाचें साधन होईल अशी पाकनिष्पत्ति करून सारेजण त्यांची चव घ्या आणि श्री साईला सत्याला, सदैव मनःपूर्वक भजून चिरकाल सुखाचा लाभ पदरीं पाडा.

शिरडींत श्री साईनें आपल्या आगमनानें व नांवानें हेंच शिकवलें आहे. कसें तें पहा.

औरंगाबाद जिल्ह्यांत धूप खेड्याचा चांद पाटील, घोडीवर खोगीर घालून औरंगाबादची सहल करणेस गेला. तेथें त्यानें घोडी चरण्याकरितां सोडली व शहरांत आपलीं कामें करून परत आला तों घोडीचा पत्ता नाहीं. घोडीचा शोध करीत करीत असतां त्याला आम्रवृक्षाखालीं एक फकीर भेटला. त्यानें त्याला जवळ बोलावून घेतलें व चिलीम ओढून जा म्हणून सांगितलें. त्यावर त्यानें सांगितलें. माझी घोडी चुकली आहे त्याच्या शोधांत मी आहे. त्यावर—चिलीम ओढ व शांत हो म्हणजे तुला त्या शेतांत तुझी हरवलेली घोडी मिळेल. त्याप्रमाणें त्याला ती मिळाली.

पुढें हा फकीर लग्नाच्या वऱ्हाडासमवेत चांद पाटलाबरोबर अहमदनगर जिल्ह्यांत शिरडी मुक्कामीं आला व खंडोबाच्या देवळांत भगत यानें 'आवो साई' म्हणून संबोधिलें तेंच नांव पुढें धारण करून शिरडी मुक्कामीं राहिला.

चांद = चंद्र हा कलेचा व मनाचा अधिपति अर्थात् मनरूपी पाटील ( चांद पाटील ) देहेंद्रियांवर पाटीलकी करते व त्याचा कारभार बघते.

वासनारूपी जंगलांत मायाजाल इंद्रियें व विषय ( औरंगाबाद= और = मोहक + अंग = रूप + आबाद = लयलूट ) यांचा बाजार करण्यांत मनरूपी पाटील स्वत:ला जिवात्माला—हीच ती घोडी, विसरतो. परंतु स्मृतीरूपी खोगीर जवळ असल्यामुळें तिच्या शोधार्थ तो भटकत असतो. फिरतां फिरतां त्याला थकल्या भागल्या जिवाचा श्रमपरिहार करण्याकरितां जंगलांत उभा असलेला आम्रवृक्ष दिसतो. त्या आम्रवृक्षाच्या नितांत शीतळ छायेंत एक फकीर इकडे ये व चिलीम तमाखू ओढ— म्हणजे मन शांत स्थिर होईल, व थोडा वेळ बैस, सबुरी घे म्हणजे तुला घोडी दिसेल, ( तमाखू = तम = अज्ञान + आखू = प्रतीक. बाबा अज्ञानाचें प्रतीक तमाखू ज्ञानरूपी निखाऱ्यानें जाळीत व ज्ञानामृतरूपी धूर ते स्वत: पिऊन भक्तास पाजीत )

इतकें झालें म्हणजे श्रद्धा सबुरी, मिळाली तरी, अंहपणाचा मद जिरवल्या- शिवाय, आणि तो सुद्धां देहाहंकार— सात्विक अहंकार— 'सोऽहं' जागृत होणार नाहीं [ अहंमदनगर=अहं+मदन+गर,='मी रूपी मदनाचा कैफ' ] व तो अखंड नामस्मरणानें — 'अल्लामालिक' या शब्दानें म्हणजे साधी सरळ सोपी अशा भक्तिभावानें जागृत करून साईचें रूप—स+आई निगुर्ण परब्रह्माचें सगुण प्रतीक, पहा.

**संपादक.**

---

# सुधीर—स्मृतिलहरी

( १ )

कल्पित कथा बहुधा अद्भुत आणि अकल्पित घटनांनीं भरलेल्या असतात, परंतु केव्हां केव्हां सत्यसृष्टींतील घटना त्याहूनही जास्त अकल्पित व अगाध असतात; व त्यांतल्या त्यांत सद्गुरूंच्या पुण्यप्रभावाशीं निगडीत असणाऱ्या कथा अतिशय अद्भूत व हृदयंगम असतात याबद्दलचा पुरावा खालील स्मृतिलहरींमध्यें आढळेल.

तारीख ८ नोव्हेंबर १९४६ च्या रात्रीं सुमारें बारा वाजतां घडलेली ती घटना माझ्या मनःचक्षूंपुढें अद्याप ओतप्रोत तरंगते. कोपरगांवच्या बाजारपेठेपासून एक फर्लांगच्या अंतरावर असलेलें तें गोदावरी नदीचें भव्य पात्र, त्यामधून रहदारी-

साठीं बांधलेली ती फरसबंदी सडक, ढगांच्या आडून हळूच डोकावणाऱ्या चंद्राच्या अंधुक प्रकाशांत त्या सडकेवरून गुडघाभर उंचीच्या बेतानें नदीचा गढूळ प्रवाह वरून जोरानें वहात असतांना त्यामधून वेगानें चालणारा आमचा टांगा व कोणत्याही क्षणीं सडकेच्या न दिसणाऱ्या कडेवरून टांगा खालीं पात्रांत गडगडेल या धास्तीनें वरकरणीं उड्या मारण्याच्या तयारीनें परंतु अक्षरशः मुठींत जीव घेऊन त्या टांग्यांत बसलेले आम्हीं चौघे इसम असें रोमांचकारी चित्र हुबेहूब डोळ्यांपुढें अद्याप उभें रहातें.

शिरडीला जाऊन श्री साईबाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याबद्दलचा माझा बेत वर्षदीडवर्ष चालला होता, पण कांहीं ना कांहीं कारणामुळें तो लांबणीवर पडला. अखेर १९४६ सालीं दसऱ्यानंतर तारीख ८ नोव्हेंबरला माझे मित्र डॉ. गव्हाणकर व आणखी दोघे मिळून आम्ही चौघेजण संध्याकाळच्या गाडीनें शिरडीला जाण्यासाठीं बोरीबंदरवरून निघालों. गाडी मनमाडच्या नजीक येतां येतां एकाएकीं पाऊस पडूं लागला. आम्ही मनमाडला पोहोंचलों त्यावेळीं बारीक पाऊस पडतच होता, परंतु आम्हीं गाडी बदलून दौंड—मनमाड लाईनच्या गाडींत बसलों तोंवर पाऊस ओसरला. कोपरगांव स्टेशनवर आम्ही रात्रीं सुमारें साडे नऊवाजतां उतरलों त्यावेळीं आकाश बरेंच निवळून थोडासा चंद्रप्रकाश दिसत होता व एकंदर वातावरण शांत व आल्हादकारक होतें. डॉ.नीं अगाऊ पत्र पाठवून शिरडीहून बैलगाडी मागविली होती, परंतु ती न आल्यामुळें थेट शिरडीपर्यंत एक टांगा ठरवून आम्ही लगेच निघालों. कोपरगांवच्या बाजारपेठेंत आल्यावर एका उपारगृहांत फराळ केला व थोडी विश्रांति घेऊन सुमारें ११ वाजतां पुढच्या प्रवासासाठीं निघालों. दारांत येऊन टांगा पहातों तों टांगेवाला रडकें तोंड करून आमच्याकडे येऊन म्हणाला कीं, दूरवर पाऊस पडल्यामुळें नदीला एकाएकीं जास्त पाणी आलें आहे व त्यामुळें रात्रीच्या वेळीं नदींतून टांगा नेणें शक्य नाहीं. प्रथम त्याच्या शब्दावर आमचा विश्वासच बसेना व आम्हाला वाटलें कीं, पुणेरी टांगेवाल्याप्रमाणें हा कांहीं तरी थापबाजीचा प्रकार असावा, म्हणून आम्ही त्याला नदीच्या कांठापाशीं टांगा नेण्यास सांगितलें. तिथें जाऊन पाहातों तर वरच्या बाजूनें गढूळ पाण्याचा प्रवाह जोरानें येत होता व प्रवाहामधून जाणाऱ्या चिरेबंदी सडकेवर सुमारें गुडघाभर वहात्या पाण्याचा थर होता, त्यामुळें सडकेचा उंच भाग दिसत नव्हता. अशा वेळीं गाडीचें चाक किंचित एकीकडे कलंडलें तर उतारूंसह सबंध गाडी खालीं वहात्या प्रवाहांत गडगडणार होती. या मोठ्या नद्यांची गंमत अशी आहे कीं पावसाळा संपला म्हणजे नदीच्या पात्राचा बराचसा भाग कोरडा ठणठणीत असतो, पण आसपास थोडासा पाऊस पडला कीं लगेच क्षणोक्षणाला सर्व बाजूनीं पाणी जमून सबंध पात्र अथांग भरून पाण्याचा प्रचंड प्रवाह वाहूं

लागतो. अशा वेळीं पाणी किती वेळांत किती प्रमाणांत वाढेल हें निश्चित अजमावितां येत नाहीं व त्यामुळें त्या बाबतींत कोणीही कांहीं जोखम घेण्यास धजत नाहीं.

वस्तुस्थिति प्रत्यक्ष पाहिल्यावर टांगेवाल्याच्या म्हणण्याची सत्यता आम्हाला पटली, परंतु एक तर आमची कोपरगांवला रात्रीं रहाण्याची सोय नव्हती व दुसरें आम्हा सर्वांना शिरडीला जाण्याची अनावर उत्कंठा होती. आमचे मार्गदर्शक डॉ. गव्हाणकर हे खरोखर उच्च दर्जाचे साईभक्त आहेत. बाबांवर त्यांची निष्ठा एवढी अढळ आहे कीं, त्याच्या जोरावर ते कोणत्याही संकटांत बिनदिक्कत उडी घेतात व त्याला बेडरपणें तोंड देतात. प्रस्तुतप्रसंगीं हीच त्यांची दृढनिष्ठा कामाला आली. त्यांनीं टांगेवाल्याला सांगितलें कीं, तूं बेलाशक टांगा हांक, कांहीं दगाफटका झाला तर त्याचा जबाबदार मी आहें. पण टांगेवाला अजीजीनें सांगूं लागला 'साहेब, तुमची जबाबदारी ठीक आहे, पण घोड्याचा पाय खालीं गेला तर टांगा वाहून जाईल, घोडे मरतील व मी गरीब अन्नाला महाग होईन. बाजारांतल्या सगळ्या टांगेवाल्यांनीं मला बजाविलें आहे कीं, वाटेल तें भाडें मिळण्यासारखें असलें तरी टांगा नदींत घालण्याचा मूर्खपणा करूं नको. नाहीं तरी मी चालत आलेलें भाडें कां सोडलें असतें ?' डॉ. साहेबही तितकेच खंबीर होते. त्यांनीं टांगेवाल्याला निक्षून सांगितलें, 'आम्ही बाबांच्या अनुज्ञेनें बांबाच्या दर्शनाला जात आहोंत. माझी पक्की खात्री आहे कीं तुझा टांगा सुरक्षित पलीकडे जाणार. तूं बाबांचें नांव घेऊन सरळ टांगा हांक. इतकेंही असून तुझ्या टांग्याला कांहीं अपघात झालाच तर तुझ्या टांग्याची सबंध किंमत मी भरून देईन,' असें म्हणून त्यांनीं त्याला आपलें पैशांचें पाकीट काढून दाखविलें. या बोलण्याचा त्याच्या मनावर जादूसारखा परिणाम झाला. आम्हाला त्यानें शिस्तीनें टांग्यांत बसविलें. आम्हीही डॉ. च्या धीरावर भीतभीत टांग्यांत बसलों व टांगा चालूं लागला. खालून गढूळ पाण्याचा प्रवाह वाहत होता. घोड्याच्या पायांनीं पाण्याचे शिंतोडे आमच्या कपड्यांवर उडत होते. चंद्राच्या अंधूक प्रकाशांत नदीचें भरलेलें विस्तीर्ण पात्र मध्यरात्रीच्या त्या प्रशांत वेळीं जास्तच धीरगंभीर भासत होतें. अक्षरशः मुठींत जीव व तोंडांत बाबांचें नांव घेऊन आम्ही एक एक क्षण कंठीत होतों. अखेर ४–५ मिनिटांत पैलतीराला सुरक्षित पोहोंचल्यावर 'श्री सांईमहाराज की जय' असा जयघोष आम्ही मनःपूर्वक केला. टांगेवालाही आश्चर्यचकित होऊन डॉ. ना म्हणाला 'साहेब, मी कैक वर्षें हा धंदा करतों व हजारों लोकांशीं धंद्याच्या निमित्तानें माझा संबंध आला, पण आजपर्यंत तुमच्यासारखा हिंमतबहाद्दर मीं पाहिला नाहीं. त्याशिवाय अशावेळीं टांगा हाकण्याची माझी छाती झाली नसती.' डॉ. नि हसत उत्तर दिलें, 'ही हिंमत माझी नाहीं. केवळ बाबांच्या आधारावर मी जीगर करतों.' शिरडींत आम्हीं सुमारें रात्रीं दीड वाजतां पोहोंचल्यावर आम्हाला समजलें कीं, नदीला पाणी आल्यामुळें शिरडीच्या बाजूनें एकही गाडी कोपरगांवला गेली नव्हती. आम्हीही मनांत समजलों कीं, भवसागराच्या

पैलतीराला सुखरूप पोहोंचविणारा सद्गुरु त्याच्यावर विश्वास ठेवल्यावर नदीच्या पैलतीरला कां नाहीं पोहोंचविणार ?

( २ )

गेलीं तीनचार वर्षें मी श्री साईबाबांच्या तसबिरीची नित्यनेमानें पूजा करतों. सुमारे अडीच वर्षांपूर्वी सकाळीं ९ वाजतां पूजा आटोपल्यावर धुपाटण्यांतून जळजळीत निखोर आणून मीं धूपारती दाखविली, धुपाटणें तसेंच देवाच्या समोर स्टुलावर ठेवलें व देवाच्या फळीवरील नैवेद्याची वाटी काढण्यासाठीं स्टुलावर चढलों. माझ्या धोतराचा सोगा स्टुलावरच्या धूपाटण्यावर पडला त्याचें मला भानच नव्हतें. नैवेद्याची वाटी घेऊन खालीं उतरल्यावर पहातों तों धोतराचा जेवढा भाग निखाऱ्यावर पडला होता तेवढाच फक्त एक पैशाएवढा भाग जळला होता, बाकी धोतर जशाचें तसें होतें. अशा परिस्थितींत कोरडें धोतर पेटायला कितीसा वेळ लागला असता व तसें झाल्यावर माझी काय अवस्था झाली असती ! पण बाबांचें कृपाछत्र असल्यावर कोणतेंच संकट दगा देऊं शकत नाहीं.

ले. **जलबिंदू**

---

# साई प्रभाव

( १ )

रा. रा. संपादक महाशय यांस                                        ( साई लीला )

सा. न. वि. वि. खालील अनुभव आपण आपल्या साई लीलेंत प्रसिद्ध करावा.

मी कुर्ला येथें रहातों. आज इंटर सायन्सच्या ( बीग्रुप ) सेंट झेवीयर कॉलेज मध्यें अभ्यास करीत आहें. मी मॅट्रिकला कुर्ला येथें शाळेंत जात होतों व त्यावर्षी म्हणजे १९४६ सालीं कै. पाटणकर वकील यांचा आमच्या शाळेकडे हिंदू मुसलमानाच्या दंग्यांत खून झाला असल्यामुळें आमचा अभ्यास पुरा झाला नाहीं. म्हणून मी वांद्रें येथें आजोळीं रहाण्यास गेलों व डिसेंबर १९४६ सालीं, वांद्रे म्युनिसीपल इंग्लिश हायस्कूल मध्यें नांव नोंदलें. माझी परीक्षा घेण्यांत आली व मी सर्व विषयांत नापास झालों. शाळेचे प्रिंसिपॉल यांनीं माझ्या आजोबांना सांगितलें कीं तुमचा नातु फारच मागें आहे व त्याचा अभ्यास आतां होणार नाहीं. तरी प्रिलिमिनरी परीक्षेंत जर तो नापास झाला तर त्याला परीक्षेला बसतां येणार नाहीं. मला फार

वाईट वाटलें व माझा सर्व विश्वास ' सद्गुरु साईबाबा ' यांच्यावर असल्यामुळें मी त्यांच्यावर विश्वास ठेवून खेर मास्तर यांच्याकडे खाजगी शिकण्यास जाऊं लागलों. खेर मास्तरांनीं बरीच मेहनत घेऊन शिकवलें व मी प्रिलीमिनरी परीक्षेंत शेकडा ५० टक्यांनी पास झालों.

मी माझा मॅट्रिकच्या परीक्षेचा नंबर बघण्याकरितां गेलों परंतु त्या दिवशीं नंबर लागले नसल्यामुळें मी परत येत होतों. त्या वेळेस आगगाडींत मला एक फकीर भेटला व त्यानें माझा नंबर सांगितला व कांहीं प्रश्न सांगितले व ' तुम मेरा बेटेका बेटा हूं, पास हो जायेंगा'. मी ती सर्व हकीगत माझ्या आजीस सांगितली व खरोखरी-नेंच माझा नंबर, फकीरानं सांगितलेलाच होता व परीक्षेंत सुद्धां त्याच्या आज्ञेप्रमा-णेंच वागलों म्हणून मी पहिल्याच वर्षी पास झालों, इतकेंच नव्हें तर ज्या शाळेंत मला फॉर्म मिळण्याची आशा नव्हती त्या शाळेंतून मी पहिला आलों व माझें नांव शाळेच्या फलकावर झळकलें. कुर्ल्याला गेल्याबरोबर ही सर्व घडलेली हकीकत वडिलांना सांगितली व वडिलांनीं मला पास झाल्याबरोबर दुसरें दिवशींच ज्या फकिरानें तुला आगगाडींत नंबर सांगितला व पास करून घेतला त्या फकिराला—म्हणजे श्री 'साईबाबाला' पेढे दे म्हणून शिरडी येथें पाठविलें. मी त्याप्रमाणें शिरडीस जाऊन त्यांच्या समाधीचें दर्शन घेतलें व परत आलों.

आपला,

**प्रमोद**

---

# ' ॐ श्रीसाई '

सद्गुरु साईंची प्रभा ऐकून, कांदिवलीचे एक गृहस्थ, रा. रा. करसनदास गोवर्धनदास हे शिरडी मुक्कामीं गेले. ता. २९-१०-४८ रोजीं त्यांना समाधीमंदि-रांतील सर्व पूजाअर्चेचा धार्मिक विधी पाहून आनंद झाला, व त्यांनी आपला आनंद-पत्रद्वारें माझ्याकडे पाठविला आहे. त्यांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, 'शिरडी क्षेत्रीं ' यात्रेकरूंची व्यवस्था फारच समाधानकारक होत आहे. तसेंच धार्मिक विधी व दिवसांचा सर्व धार्मिक कार्यक्रम पाहून मनाला असें वाटलें कीं, ही नुसतीच समाधी नाहीं तर, चालती बोलती ज्ञानामृताची खाण आहे, कीं जेथें सगुणभाव अव्यक्त स्वरूपांत प्रगट होतो. खरोखरीच श्री साईबाबा हे समाधींत चैतन्य स्वरूपांत आहेत, फक्त भाव पाहिजे. त्या वेळेस त्यांना सुचलेले विचार त्यांनीं कवितेंत लिहिले आहेत ते:—

तो नर नोहे नारायण । जो का ब्रह्मि परायण ।
नित्य ज्ञाना-नंदरूप । त्यासी कायसें पुण्यपाप ।
नाहीं मायेचा संबंध । निरंजन शुद्धबुद्ध । °
देव [साई] चालता बोलता । थोर कोणत्या परता ।
याचा घडता सहवास । उद्धरति भाविक दास ॥

ह्यावरून सर्व साईभक्तांनीं शिरडींत दुसऱ्या लुंग्यासुंग्याच्या नादीं न लागतां समाधी मंदिरांत भाविकपणानें आपलें गाऱ्हाणें सांगावें म्हणजे तें श्री साईला कळेल व भक्ताला त्याप्रमाणें फळ मिळेल. म्हणून रा. रा. करसनदास गोवर्धनदास यांचा प्रत्यक्ष अनुभव छापला आहे. —संपादक

—०—

ठाणें दि. ८-८-४८

श्री. सन्मान्य संपादक 'श्रीसाईलीला त्रैमासिक यांस सप्रेम प्रणाम वि. वि. येत्या श्रीसाईलीलेच्या अंकांत खालील मजकुरास स्थान मिळेल अशी आशा आहेः—

# श्री. कै. अण्णा चिंचणकर मिळकतीसंबंधीं माहिती

ह्या मिळकतीसंबंधानें माझ्या समजुतीप्रमाणें शेवटचा लेख श्रीसाईलीला मासिक वर्ष २०, अंक ७-८-९ यांतील पृष्ठें २५, २६, २७ व २८ यांवर आलेला आहे. व त्यांत १९४३ ऑगस्टपर्यंत किंवा शके १८६४ पर्यंतचा हिशोब दिलेला आहे. त्यांत ह्यासंबंधानें वेळोवेळीं परिपूर्ण माहितीचे जे निरनिराळे लेख कै. पूज्य ना. रि. देव ह्यांनीं लिहिले त्याचें सूचिपत्र पृष्ठ २६ वर दिलेलें आहे. त्या नंतरची घडलेली हकीकत व माझ्याजवळ असलेले हिशोब हे साईभक्तांच्या माहितीसाठीं देण्याचा विचार केला आहे.

दुर्दैवानें ह्या मिळकतींत अत्यंत मन लावून मेहनतीनें काम करणारे असे आमचे परमपूज्य वडील बा. वि. देव हे दि. १-१-१९४६ ला श्रीसाईचरणीं विलीन झाले, ही गोष्ट साईभक्तांना विदित आहेच. त्यानंतर दि. १४-४-४६ रोजीं ह्या मिळकतीच्या बाकीच्या विश्वस्तांनीं खालील दोन ठराव मंजूर केलेः—

**ठराव १.** डहाणू रोड ता. १४-३-४६

कै. बाळकृष्ण विश्वनाथ उर्फ बाळासाहेब देव यांच्या निधनाबद्दल या विश्वस्तांना अत्यंत दुःख होत आहे. त्यांनीं आतांपर्यंत अण्णा चिंचणकर ट्रस्टचें काम अत्यंत मेहेनत घेऊन केलें असल्यामुळें त्यांचें निधनामुळें श्रीसाईबाबांचा एक

परमभक्त नाहींसा झाला असून आण्णा चिंचणकर ट्रस्टचें अत्यंत नुकसान झालें आहे. श्रीसाईबाबा आपल्या परम भक्तास सद्‌गती देतील अशी सर्वांस आशा आहे.

(सही) र. भा. पुरंदरे (सही) A. N. Khare

(सही) वा. आ. करंदीकर (सही) R. J. Karandikar

**ठराव** २. कै. बाळकृष्ण विश्वनाथ उर्फ बाळासाहेब देव यांच्या निधनामुळें त्यांच्या जागीं ट्रस्टी म्हणून श्री. श्रीपाद बाळकृष्ण देव यांची आम्ही सर्व ट्रस्टी नेमणूक करीत आहोंत.

(सही) र. भा. पुरंदरे सही A. N. Khare

(सही) वा. आ. करंदीकर + सही R. J. Karandikar

याच कामीं शिर्डी संस्थानच्या व्यवस्थापक सभेनें खालील ठराव दि. २७–१–४६ च्या सभेंत पसार केला आहे:—

ही सभा नमूद करते कीं, श्री. बाळासाहेब यांनीं शिर्डी संस्थानचे विश्वस्त या नात्यानें गेलीं १५–१६ वर्षें जी अव्याहत सेवा केली, तसेंच कै. चिंचणकर ट्रस्टच्या इस्टेटीची व्यवस्था पाहून संस्थानास सालीना सुमारें ७००–८०० रुपयांचे उत्पन्नाचा लाभ करून दिला व अशा रीतीनें संस्थानास कायमचे ऋणी करून ठेविलें आहे. त्याबद्दल सभा त्यांची अत्यंत आभारी आहे. या सेवेच्या प्रीत्यर्थ त्यांच्या आत्म्यास पूर्ण शांति देवो अशी श्रीचे चरणीं प्रार्थना आहे. सर्वानुमतें मंजूर

श्रीसाईचरणीं विलीन होण्याच्या अगोदर एक दिवस आमचे परमपूज्य वडील कै. बा. वि. देव ह्यांनीं आमच्या पूज्य कै. मातुश्रींजवळ असें सांगितलें कीं, त्यांना एक स्वप्न पडलें व त्या स्वप्नांत ते डहाणूच्या बाजूला जात होते असें त्यांना दिसलें. याचा अर्थ माझ्या समजुतीप्रमाणें असा कीं, त्यांची एक तीव्र इच्छा कीं, चिंचणीच्या या मिळकतीमध्यें मृत्युपत्र करणारांच्या इच्छेप्रमाणें श्रीसाईबाबांचें मंदिर बांधलें जावें व त्या वेळेपर्यंत जरी मंदिर बांधण्यासंबंधीं योग्य त्या अधिकाऱ्यांकडून जरूर ती परवानगी आली होती व जरी त्यानंतर श्री. रामकृष्ण जनार्दन उर्फ तात्या करंदीकर व कै. श्री. रघुवीर भास्कर उर्फ दादा पुरंदरे यांच्या श्रमानें मंदिराच्या कामाला सुरुवातही झाली होती तरी तें मंदीर प्रत्यक्ष पुरें होऊन त्यांत श्रीसाईंची सुबक अशी संगमरवरी दगडाची मूर्ती बसविली नव्हती; ही पूज्य वडिलांची इच्छा, जमल्यास आपण वरील दोन सज्जनांच्या मेहनतीवर व शारीरिक कष्टावर सफल करूं शकूं अशा प्रेरणेनें कामास सुरवात केली. मुख्यतः अडचणी दोन. पहिली कीं शिर्डी संस्थानला वरील मिळकतीच्या उत्पन्नांतील $\frac{1}{8}$ भाग जो द्यावयाचा तो २–३ वर्षें दिलेला नव्हता व तो हिस्सा सांठविण्याबद्दल व त्यांतून देवळाबद्दल खर्च करण्याबद्दल जरूर तो हुकूम ठाणें जिल्हा न्यायालयांतून घेतल्यामुळें मंदिराचा होणारा

अवाढव्य खर्च, कशा रीतीनें जमवावयाचा व दुसरी कीं, मंदिराचें हें बांधकाम चालू असतांना सामानाची जमवाजमव व प्रत्यक्ष देखरेख ही कोण करणार! यापैकीं पहिल्या बाबतींत मीं माझ्या पूज्य वडिलांना सुचविलें होतें कीं आपण जिल्हा न्यायालयांत अर्ज देऊन परवानगी मिळवूं. पण त्यांनीं सांगितलें कीं, त्यांना दगदग होत नसल्यामुळें तो विचार रद्द करावा. परंतु त्यांचे पश्चात् या गोष्टीची मनास हुरहुर लागून स्वतः त्या बाबींत विश्वस्त म्हणून नेमणूक झाल्यानंतर, जिल्हा न्यायालयांत अर्ज दाखल करण्याचें ठरविलें. व खालीलप्रमाणें अर्ज ठाण्याच्या जिल्हा न्यायालयांत दि. १८-४-४६ ला दाखल केला :-

IN THE COURT OF THE DISTRICT JUDGE, THANA AT THANA

Misc. Application No. 59 of 1946.

(1) Raghuvir Bhaskar Purandare, age about 70. Caste Brahmin. Occupation Retired Railway Servant. Residence-Perry Road. Bandra.

(2) A, N, Khare. age about 73. Caste Brahmin. Occupation-Pleader. Residence-Dahanu.

(3) Vasudeo Atmaram Karandikar. age about 35. Occupation-Pleader. Caste Brahmin. Residence-Dahanu.

(4) R. J. Karandikar, age about 48. Caste Brahmin. Occupation-Trade, Residence Malyan, Dahanu Road Station B, B. & C. I. Rly.

(5) Shreepad Balkhrishna Deo, age about 39. Caste Brahmin. Occupation-Pleader. Residence-Thana.

All Trustees of late Anna Chinchankar's Estate.

Applications under § 7 of Act 14 of 1920.

The applicants Trustees humbly hereby inform the Court as under:—

One Damodar Ghanashyam Bâbre alias Anna Chinchankar created a Trust by his will in 1919 July 10 and he directed payment of his debts and the building of a temple at Chinchani. The income of the residue was to be divided in four parts, one part of which was to be devoted to the upkeep of the Chinchani temple and the remainder was to be handed over to the Samsthan of Shri Sai Baba at Shirdi.

On Dec. 13, 1923, the then Trustees obtained the Probate of the will. The Executors paid off the debts of the Testator. When they administered the property, they found that the funds in their hands were not large enough to permit the building of a temple. They, therefore, prayed to this Court by application No. 61 of 1929 that after they had invested the fund and paid three fourths to the Shirdi Sansthan as directed in the will, the remaining one fourth of the income should be devoted to Educational objects in Chinchani and Shirdi. This Court had however ordered that the whole of the income of the Estate should be equally devoted to the Educational institutions at Chtnchani and Shirdi.

The then Trustees filed a Civil Revisional application No, 260 of 1930 in the Honourable High Court of Judicatrue, against the order of this Court. The Hon'ble High Court was pleased to cancel the order and to remark that it was the duty of the trustees to carry out the desire of the pais, though old fashioned and ignorant Testator. As a matter of fact the intention and desire of the then Trustees also, was to see that the wish of the Testator is carried out. The intention of the Testator was that every pie of his Estate should be spent towards Shree Sai a Saint. Any how the position of the Trustees after the decision of the Hon'ble High Court was that they were bound to carry out the directions of the Testator, as they were in the will.

The funds in the hands of the then Trustees were extremely meagre, and were absolutely insufficient to build a temple and a Bhaktashala; they, therefore, requested the Trustees of Shirdi Sansthan Committee (this is also being worked under the scheme granted by the District Court, Ahmednagar) that provisionally they should go on accepting $\frac{3}{4}$th income of this Estate till the applicant Trustees had with them sufficient fund to allow them to build at least a temple. The Shirdi Trustees were clearly given to understand that giving of the $\frac{3}{4}$th income was always subject to the liabilities of the applicant trustees to build a temple out of the Estate.

On account of the general increase in prices, owning to war conditions, the applicant Trustees got good income of the property and hence they thought of construction of the temple at Chin-chani out of the Estate. The applicant Trustees, therefore, informpe the Shirdi Trustees, that the applicant Trustees will not be in daosition to pay anything to them as they had decided to discharge

the liability cast on them by the will of the Testator. But the Shirdhi Trustees do not agree to this. The applicant Trustees, therefore, think it advisable to take directions from your Honour in this matter under § 7 of the Charitable and Religious Trustees Act 14 of 1920.

The will provides that the Trustees should build a temple and a Bhaktashala out of the income of the Estate. It was after building these things that $\frac{3}{4}$th of the income of the said Estate was to go to Shirdi Sansthan and $\frac{1}{4}$th was to be retained by the applicant Trustees for the maintenance, worship etc. of the temple. For various reasons, the applicant Trustees had given up the idea of building the temple and a Bhaktashala and had prayed that the whole of the income should be applied to the purpose of Shirdi Samsthan. This Court was pleased to apply Cypres Doctrine ; but as there was a little difference in the interpretations, the then Trustees had to approach the Hon'ble High Court. Now as there is a good price for grass in the market owing to war conditions, the applicant Trustees think, that they can fulfil the desire of the Testator and also the directions of the Hon'ble High Court. The permissions for building a temple of Shri Sai at Chinchani was asked for and it has been kindly granted. The work of building the temple has also commenced. So the applicant Trustees, honestly and humbly think that they should be allowed te build the temple out of the income of the Estate, and as soon as the construction of the temple is over, the applicant Trustees are prepared to give $\frac{3}{4}$th of the then income to the Trustees of Shirdi Sansthan. But this application is being made to this Honourable Court so that there may not remain a technical flaw.

The applicants, therefore, pray that this Hon'ble Court will be pleased to direct that they are justified in accumulating the whole income of the Estate, as they have done, and accummulate further till the Trustees are able to build the temple of Shree Sai at Chinchani ; the Court may be pleased to order the cost of this application to come out of the Estate.

(Sd.) A. N, Khave
(Sd.) R. B. Purandare
(Sd.) R. J. Karandikar
(Sd,) V. A. Karandikar
(Sd.) S. B. Deo

We the above applicants Trustees, do hereby on solemn affirmations state that the contents of the above application are true to the best of our information and belief and that we have signed the same.

(Sd.) A. N. Khare
(Sd.) R. B. Purandare
(Sd.) R. J. Karandikar
(Sd.) V. A. Karandikar
(Sd.) S. B. Deo

Filed in Court
(Sd ) S. B. Deo
18-4-46.

Fix a date for hearing of this application.

18-4-46. (Sd.) R. D. SHINDE,
District Judge.

ठाणें डिस्टिक्ट कोर्टाचा चौकशी अर्ज नं १५९/१९४६ तपासून रजिस्टर करणेचा ठराव केला.

ता. ४-६-४६ (sd) V. A. Apte
क्ला. आ. कोर्ट

Issue notice to the managing Trustees of Shri Shirdi Sansthan.

8-6-46 (sd) R. D. Shinde
District Judge

## अर्जाचा खर्च

| | | |
|---|---|---|
| ( १ ). अर्जास स्टँप | १/८१० | ०-१०-० |
| ( २ ). वकील पत्र | ५/८१० | ०-१०-० |
| ( ३ ). वकीलाची फी | | ३०-०-० |
| ( ४ ). प्रोसेस फी | | २-०-० |
| | | ३३-४-० |

## सामनेवाला यांस

| | | |
|---|---|---|
| ( १ ). वकील पत्र | ४/८१० | ०-१०-० |
| ( २ ). वकीलाची फी | | ३०-०-० |
| | | ३०-१०-० |

येणेंप्रमाणें खर्च झाला आहे. ता. ५-८-४६

खरी नक्कल

(sd) V. K. Patwardhan

क्लार्क ऑफ धी कोर्ट

## IN THE COURT OF THE DISTRICT JUDGE, THANA AT THANA

Misc. Application No. 59 of 46.

| | | |
|---|---|---|
| Mr. G. K. Dabke | (1) Raghuvir Bhaskar Purandare<br>(2) A. N. Khare<br>(3) R. J. Karandikar<br>(4) Vasudeo Atmaram Karandikar<br>(5) Shreepad Balkrishna Deo | Applicants |
| | v/s | |
| Mr. G. B. Datar | Shirdi Sansthan Committee by its Managing Trustee and Emergency Hon. Secretary V. N. Gorakshakar. | Opponents. |

## JUDGMENT

This is an application by the Trustees who are appointed under the will dated 10-7-1919 of one Domodar Ghanashyam Babre alias Anna Chinchankar. The Trustees obtainted a probate of the will on 13-12-1923. In the will the Testator Damodar had directed that his debts should be paid off and out of the balance of his Estate, a temple should be built at Chinchani, in honour of Shri Sai Baba Maharaj whose devotee he was during his life time, and t hat for the maintenance of that temple $\frac{1}{4}$ the income of his property after paying off his debts should be set apart and the remaining $\frac{3}{4}$th of the incone should be sent by the Trustees to the manager of Sai Baba Estate, Shirdi in Ahmednagar district. It appears that the Estate at the death of Damodar Ghanashyam was heavily incumbered and the Trustees took some time to pay off the debts. Threafter it was found that the income from the Estate was too meagre to allow the Trustees to build a temple at Chinchani and therefore they sought the directions of this Court by application No. 61/1929 that $\frac{1}{4}$th of the income, instead of being used for the contruction of a temple should be devoted to educational purposes at Chinchani and Shirdi. This Court then gave certain directions which

were that the whole of the income of the Estate should be equally divided and it should be utilized for educational purposes at Chinchani and Shirdi. This order was revived by the High Court and a report of the Judgment of the High Court appears in 34 Bombay Law Reparter at page 113. The High Court cancelled the order of the District Judge and held that it was the duty of the Trustees to carry out the desire of the pious though old fashioned and ignorant Testator and the same coud not be utilized for any other obeject. The Trustees are now in a fortunate position in that owing to the general increase in prices due to war conditions, a considerable income is now accruing from the Estate and they think that if the income is accummulated for some years there would be sufficeint funds for building the temple and Bhaktashala at Chinchani as directed in the will, and after both these buildings are constructed out of the income, then the further direction in the will that one fourth of the income should be set apart for the maintenance of the temple and the Bhaktashala at Chinchani and the remaining three fourth should be sent by the Trustees to the manager of the Shirdi Sansthan Committee Shirdi, should come into operation. I do not think that the terms of the will can make this suggestion of the Trustees, in any way objectionable. The Shirdi Sansthan Committee was served with a notice through the managing Trustee and emergency Hon. Secretary. He appeared through Mr. G. B, Datar, pleader, and has put in a purshis that the Shirdi Sasnthan Committee are willing to abide by the orders of this Court. The Testator has directed the Trustees to build the temple and a Bhaktashala at Chinchani and it is after both these buildings are completed that the income should be divided as to provide one fourth for the maintanance of the Chinchani temple and the balance should go to the Shirdi Sansthan at Shirdi. I, therefore, direct that the Trustees should accummulate, as they have done for the last 3 years, the whole income of the Estate for such a period as would leave the income sufficient to cover the cost of constructing the temple and the Bhaktashala at Chinchani and after this is done and the temple etc. is coastructed they should divide the future income as directed by the will. The costs of the application to come out of the Estate.

5th August 1946,

(Sd.) R. O. SHINDE,
District Judge, Thana.

True Copy,
(Sd.) V. N. PATWARDHAN,
Clerk of the Court.

ह्यावेळीं योगायोग असा कीं, व श्रीसाईंचीच इच्छा म्हणून शिर्डी संस्थान कमिटीच्या त्रैवार्षिक निवडणुका झाल्या व त्या निवडणुकींत भक्तांच्या इच्छेमुळें कमिटीवर निवडून येण्याचें भाग्य मला लाभलें व त्यांतही पुढें कमिटीच्या सदस्यांच्या सद्हेतूपूर्वक आग्रहामुळें मला सहज कमिटीचें चिटणिसांचें काम पत्करावें लागलें. ह्या सर्व सुयोगानें वरील अर्जाचा वरीलप्रमाणें निकाल, दि. ५-८-४६ ला ठाणें जिल्हान्यायाधीश श्री. आर. डी. शिंदे यांनीं दिला व चिंचणी येथील श्रीसाई-मंदिर व भक्तशाळाही बांधून होईपर्यंत चिंचणकर विश्वस्तांनीं $\frac{3}{4}$ हिश्याचें राखून ठेवलेले पैसे देऊं नयेत व सबंध खर्च भरून येईपर्यंत पुढेंही देऊं नयेत असा हुकूम दिला.

ह्यात्र कामीं दि. १४-७-४६ रोजीं शिर्डी संस्थान कमिटीनें जो ठराव केला त्याची नक्कल खालींलप्रमाणें:—

'सर्वानुमतें असें ठरलें कीं, कै. चिंचणकर यांचे ट्रस्टीकडून आलेल्या कोर्टाच्या नोटीस बाबत ही कमिटी मे. ट्रस्टी यांस या कमिटीच्या वतीनें त्या अर्जावर कोर्ट जो निकाल देईल तो मंजूर करणेंस अधिकार देत आहे. त्या बाबतींत त्यांनीं वकील करण्यास अगर इतर जरूर तो खर्च करण्यास ही कमिटी त्यांस अधिकार देत आहे.

( अपूर्ण )

आपला नम्र साईदासानुदास
**श्रीपाद बाळकृष्ण देव**
विश्वस्त, चिंचणकर मिळकत ठाणें

ठाणें दि. २५।९।४८

श्री. सन्मान्य संपादक 'श्रीसांईलीला' त्रैमासिक यांस सप्रेम प्रणाम. वि. वि. येत्या श्रीसांईलीलेच्या अंकांत खालील मजकुरास स्थान मिळेल अशी विनंती—

# कै. बाळासाहेब देव यांचें अल्पचरित्र

(पुढें चालू)

अशा रीतीनें कै. ती. काका, कै. ती. गं. भा. मथुआत्याबाईच्याकडे इंग्रजी शिक्षणाकरितां पुण्याला राहिले. तेथें त्यांची वागणूक फारच मनमिळाऊ अशी होती व सर्वजणांनीं कांहींहीं काम सांगितलें तरी बिनतक्रार ते करीत असत व सर्वजण निजल्यानंतर कुणालाही त्रास होणार नाहीं अशा रीतीनें अभ्यास करीत असत. ती. काकांना ड्रॉइंगचाही नाद असें; सातवी यत्तेंत एक वर्ष हे नापासझाल्याबरोबर, ते पुण्याहून दुसरीकडे गेले व तेथें एका वर्षांत, मॅट्रिक, स्कूलफायनल व ड्राइंगची अशा तीन परीक्षा पास होऊन आले. मुख्य प्रश्न होता या पुढच्या शिक्षणाचा; त्यावेळेच्या वडील मंडळींची इच्छा कीं जेवढें शिक्षण झालें तेवढें पुष्कळ झालें आतां ती. काकांनीं घरचा प्रपंच सांभाळावा. परंतु ती. काकांची महत्त्वाकांक्षा ह्यापेक्षां किती तरी मोठी. त्यांना त्यामुळें वडील मंडळींचें म्हणणें पटेना व म्हणूनच त्यांनीं एक दिवस कोणास नकळत पौडहून पाऊल उचलतें घेतलें व इंदूरला ते गेले. तेथें शिकवण्या वगैरे करून आपल्या स्वतःच्या महाविद्यालयीन शिक्षणाची सोय केली व ते तेथून बी. ए. ची परीक्षा पास होऊन आले. बी. ए. झाल्यानंतर ते परत पौडला आले. सर्व घरच्या मंडळींना ह्या त्यांच्या विजयाबद्दल आनंद, कौतुक व अभिमान वाटला. ती. काकांची इच्छा पुढें एल्.एल्. बी.ची परीक्षा पास होणेंची होती. परंतु मानवाची इच्छा व विधिलिखित हें नेहमीं जुळेल असें नाहीं. (मनसा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्र योजयेत्). वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास करण्याकरितां, आमच्या पूज्य वडिलांनीं कल्याणला येऊन तेथील शाळेंत शिक्षकाची नोकरी करण्याचेंही नक्की केलें. व तेथें राहून मुंबईला जाऊन वकिलीच्या परीक्षेच्या टर्म्स भरावयाच्या असें ठरविलें. पण तेवढ्यांत पुणें जिल्ह्यांत १८९६ सालचा गाजलेला व कहर केलेला प्लेग सुरू झाला व त्यामुळें घरांतून बाहेर पडण्याची ती. काकांना परवानगी मिळेना. घरीं बसून तरी काय करणार ! त्यावेळेला दुष्काळाचीं सरकारी कामें सुरू झाली. त्यांत मुळशीच्या कामावर वरिष्ठ अधिकारी म्हणून ती. काकांची नेमणूक झाली. तेथें असतांनाही त्यांनीं पुष्कळ लोकांचा फायदा करून दिला, व घरांतल्या मंडळींनाही पुष्कळ मदत केली. हीं कामें जवळजवळ दोन वर्षे चालली होतीं; त्यानंतर त्यांनीं सरकारी नोकरींत जागा मिळण्याकरितां दोन खात्यांत अर्ज केले—एक

शिक्षण खातें व दुसरें जमीन–महसूल खातें. दोन्ही खात्यांत सुरवातीचा पगार ३० तीसच रुपये होता; दोन्ही खात्यांकडून बोलावणीं आली. व प्रश्न पडला कीं कोठल्या खात्यांत शिरावें. पूर्वीच्या काळीं कलेक्टर, कमिशनर या लोकांचे मुक्काम पौडला येत असत. त्यावेळेचा त्या लोकांचा थाट व त्यांचें वैभव याचा थोडासा, आमच्या पूज्य वडिलांच्या लहानपणीं मनावर परिणाम झालेला होता म्हणून सरतेशेवटीं जमीन महसूल खात्यांत नोकरी करावयाची असें ठरवून त्यांनीं त्या खात्यांत १८९८ सालीं प्रवेश केला. त्यांची बहुतेक नोकरी ठाणें जिल्ह्यांतच झाली. वसई, मुरबाड, मोखाडा, डहाणू, ठाणें वगैरे ठिकाणीं त्यांची नोकरी झाली. १९१३ पासून १९१७ पर्यंत ते सुरत जिल्ह्यांत चिखली या तालुक्याला मामलेदार होते. १९१७ पासून त्यांचें वास्तव्य ठाण्यालाच झालें. जरी त्यांच्या बदल्या कुर्ला व वांद्रें येथें झाल्या तरी रहावयास ते ठाण्यालाच होते. जरी त्यांची पेन्शन घेण्याची मुदत मार्च १९२८ मध्यें संपत होती तरी सरकारनी त्यांना आणखी १ वर्ष नोकरी करण्याची परवानगी दिली व ते १ एप्रिल १९२९ पासून सेवानिवृत्त झाले व त्यानंतर त्यांनीं फक्त श्रीसांईचीच सेवा केली व अशा रीतीनें त्यांत मग्न असतांना आमच्या ठाण्याच्या हल्लींच्या बिऱ्हाडीं म्हणजे ५० नेताजी सुभाष रस्ता, दांडेकर यांचे वाड्यांत पहिल्या मजल्यावर, ते सर्व आम्हा मुलांच्या व नातवंडांच्या सान्निध्यांत असतांना आम्हाला दुःखसागरांत लोटून दि. १ जानेवारी १९४६ रोजीं श्रीसांईचरणीं विलीन झाले !

ती. काकांचें लग्न माझ्या पूज्य मातोश्री कै. ती. जानकीबाई ( माहेरचें नांव भीमाबाई देवस्थळे ) यांच्याशीं त्यांच्या १८ व्या वर्षी झालें. त्यावेळेला माझ्या मातोश्रींचें वय अवघें ९ वर्षांचें होतें. ज्यावेळेला पौडची मंडळी आमच्या आईला पहावयाला गेली त्यावेळेला ती पंक्तीला वाढीत होती त्यावरूनच परीक्षा करून तीस पसंत केली गेली. ही देवस्थळे मंडळी, वावोशी ता. पेण, जि. कुलाबा येथें रहाणारी होती. एकंदर लग्न थाटांत झालें अर्थात् त्यावेळच्या मानानें; व त्यानंतर देवस्थळे मंडळींनीं दिवाळसणही दिला. आम्ही हयात अशीं तीन मुलें आहोंत. मी व माझे बंधु डॉ. श्रीनिवासराव देव हे जुळे बंधू आहोंत; आमची एक थोरली बहीण ती. सौ. ताई आहे. तीही एल्. सी. पी. एस्. झालेली आहे. ती सध्यां दादरला असते. तिचें हल्लींचें नांव डॉ. मायावतीबाई गुर्तु असें आहे. डॉ. श्रीनिवासराव हे एल्. सी. पी. एस्. झालेले आहेत. त्यांनीं कांहीं दिवस मिलिटरीमध्यें नोकरी केली व हल्लीं ते राजूर, ता. अकोला, जि. अहमदनगर येथें एन्. एम्. पी. आहेत; माझें स्वतःचें शिक्षण बी. ए. ( ऑनर्स ) एल्एल्. बी. पर्यंत झालेलें आहे. मी प्रीव्हियस झाल्यानंतर ती. काकांना म्हटलें कीं, मी कॉमर्सकडे जातों. तेव्हां ते मला म्हणाले कीं, आपल्या घराण्यांत मीच फक्त बी. ए. झालों

आहे, तर प्रहिल्या प्रथम तूं बी. ए. हो नंतर तुला जो अभ्यास करावयाचा असेल तो कर. त्यांच्या इच्छेप्रमाणें मी बी. ए. झालों. व नंतर एम्. ए. व एल्‌एल्. बी. या दोन परीक्षांच्या टर्म्स भरावयाला सुरवात केली. परंतु पुढें मी आजारी पडलों व फक्त एल्‌एल्. बी. च्या परीक्षेला बसलों. व १९२९ सालीं एल्‌एल्. बी. झालों. व १९३० सालापासून ठाणें येथें वकिली करीत आहे.

आमचा एक गोडसा धाकटा भाऊ श्रीविलास या नांवाचा होता. पण तो १९२० सालीं टायफॉइडनें ईशचरणीं विलीन झाला. ह्याच्या निधनाच्या अगोदर थोडीं वर्षें ती. काका, ती. सौ. ताई, तिचे यजमान व श्रीविलास अशी मंडळी श्रीबाबांच्या चरणीं प्रणाम करण्याकरितां गेली होती. त्यावेळेला श्रीबाबांनीं ती. काकांच्याजवळ सर्वांची चौकशी केली व श्रीविलासकडे पाहून असें सांगितलें होतें कीं या भाऊला जीव लाव. त्यांच्या या शब्दांचें महत्त्व त्यावेळेला कळलें नाहीं पण तो १९२० सालीं जेव्हां आम्हांला सोडून गेला त्यावेळेला, त्याच्या निधनाची ती पूर्वसूचना होती असें वाटतें. मागें आम्ही चिखलीला असतांना एक दिवस विलास व मी भांडत होतों व भांडतां भांडतां मीं त्याला म्हटलें ‘ माझ्याशीं भांडूं नकोस, जर भांडलास तर मी बाबांना सांगेन.’ पुढें आम्ही सर्व मंडळी शिर्डीला गेलो असतांना बाबांनीं विलासला एकट्याला सांगितलें कीं, बाबुरावशीं भांडूं नये. असो. इकडे विलास कैलासवासी झाला व नंतर १५ दिवसांनीं आमच्या ताईचें यजमान पांचगणी येथें श्रीचरणी विलीन झाले. हे दोन मृत्यू कुणाच्याही मनावर परिणाम होण्यात पुरेसे होते. पण केवळ आमच्या ती. काकांची वृत्ती ही तत्त्ववेत्यांची असल्यामुळेंच त्यांनीं हे आघात कसे तरी सहन केले. आमच्या दोघांच्या मुंजी चिखली येथें १९१४ सालीं मोठ्या थाटानें उरकण्यांत आल्या. आमची दोघांचीं लग्नें ठाणें येथें अनुक्रमें १० फ्रेब्रुवारी व १२ फेब्रुवारी १९३१ सालीं झालीं. आमचा दोघांचा जन्म डहाणू येथें १९०७ सालीं झाला. नोकरीवर असतांना कै. ती. काकांची आवड नेहमीं सार्वजनिक अगर लोकोपयोगी कामें करण्याची असे. ते डहाणूला असतांना डहाणूहून तेरा मैलांवर महालक्ष्मी या नांवाच्या देवीचें देऊळ आहे. रस्त्यापासून आंत २–३ मैल जावें लागतें. येथें जाण्यास रस्ता नव्हता. खूप खड्डे होते व ही देवी तर तेथील आसपासच्या बऱ्याच लोकांची देवता. कित्येक बैलगाड्या, टांगे मोडले तरी त्या रस्त्याकडे कोणाचें लक्ष जाईना. ती. काकांनीं हा रस्ता करण्याचे मनांत योजिलें व त्या दिशनें मेहनत करण्यास सुरवात केली. डहाणूजवळच २ मैलांवर सावटें या नांवाचें बंदर आहे. तेथें लाकडाचा मोठा व्यापार चालत असे. तेथील व्यापारीही दानधर्माचे भोक्ते असत. व त्यांची ती. काकांच्यावर त्यांच्या एकंदर वागण्यामुळें भक्ति असे. अशा रीतीनें वर्गणी गोळा करून ते डहाणूला होते तेथपर्यंत म्हणजे १९०७ पासून १९१३ पर्यंत, हा रस्ता तयार

करून घेतला. त्याच्यावर जरी मोटारी गेल्या तरी रस्ता खचत नव्हता व अजूनपर्यंत तेथें जाणारा प्रत्येक यात्रेकरू आमच्या पूज्य वडिलांची आठवण करतो. नुक्तेच कांहीं वर्षांपूर्वी मी डहाणूला गेलों होतों तेथें त्यावेळला श्री. फडके हे मामलेदार होते (हल्लीं हे गुजराथेंत गोध्र्याला ॲडिशनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आहेत. ते ठाणें येथें असतांना त्यांनींच मला मल्लखांब, डबलबार वगैरे व्यायाम उत्तम रीतीनें शिकविला होता) ते म्हणाले कीं, तुमच्या वडिलांनीं महालक्ष्मीचा रस्ता बांधण्याच्या कामानें स्वतःचें नांव अमर करून ठेविलें आहे. आमच्या वडिलांना घोड्यावर बसण्याचा नाद फार. त्यांना एक घोडा जव्हार सरकारांनीं बक्षीस दिला होता. फारच उमदा घोडा होता तो. त्या घोड्यावर ती. वडिलांनीं सकाळीं बसून महालक्ष्मीला जावें, तेथील रस्त्याच्या बांध कामावर देखरेख करावी, सूचना कराव्यात, व परत ऑफीसच्या कामाला यावें असा त्यावेळेला त्यांचा कार्यक्रम असे. सबंध तालुक्यांत फिरतीही ते घोड्यावरूनच करीत असत.

१९१३ सालीं आमच्या वडिलांची चिखली येथें बदली झाली. तेथें ते ४ वर्षें होते. त्या गांवीं इंग्रजी शिक्षणची सोय नव्हती. त्यांच्या मनानें तेथें शाळा बांधण्याचें ठरविलें. त्यांना कळलें कीं, तवसरी येथें दोघे पारशी गृहस्थ आहेत ते चांगले धनिक आहेत व ते ह्या कामाला चांगली मदत करूं शकतील. ती. काका कांहीं गांवच्या पुढारी मंडळींसह तवसरीला वरील गृहस्थांच्याकडे गेले व त्यांना आपला उद्देश सांगितला. पण ते म्हणाले आम्ही गरीब आहोंत. पण ज्या अर्थी तुम्ही आमच्याकडे आलां अहांत त्या अर्थी आम्ही प्रत्येकजण २५।२५ रुपये आपल्या ह्या सत्कार्याला देतों. ती. काका म्हणाले, 'अशी आमची थट्टा करूं नका. आज तुम्ही जें द्याल तें मोठ्या मनानें घेण्याची तयारी आहे. पण आम्हाला जर परत फिरविलेंत व तुम्हाला जर आमच्याकडे येण्याची पाळी आली तर ह्या आंकड्यांवर किती पूज्यें चढतील तें सांगतां येत नाहीं' असें सांगून ही सर्व मंडळी परत फिरली. पुढें दैवयोग असा कीं चिखली तालुक्यांतील एक दारूचा लिलांव ह्या पारशी गृहस्थांनीं घेतला. त्यावेळेला ते आपणहून ती. काकांच्याकडे आले व म्हणाले कीं, आम्ही दोघेजण प्रत्येकजण २५००-२५०० रुपये आपल्या शाळेच्या कार्याला देतों. अशा रीतीनें त्या दोघांच्याकडून ५००० पांच हजार रुपये सुरवातीला मिळून मुहूर्त उत्तम झाला. एकंदर ५८००० अठावन हजार रुपये वर्गणी जमली. २९००० रु. स जागा विकत घेऊन सुंदर शाळेची इमारत तयार झाली व बाकीचे २९००० रुपये शाळेची शिल्लक म्हणून शाळाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यांत

आलें. त्यावेळेला इंग्रजी १ ते ५ इयत्तांपर्यंत शाळा सुरू करण्यांत आली. आतां त्या शाळेचें हायस्कूलमध्यें रुपांतर होऊन, शाळेची खूपच प्रगती झाली आहे. ती. काकांच्या निधनानंतर तेथील मुख्याध्यापकांनीं माझ्याकडे त्यांच्या छाया-चित्राची मागणी केली आहे. आम्ही दोघांनीं याच नवीन शाळेच्या इमारतींत एक वर्षभर इंग्रजी पहिल्या यत्तेंत शिक्षण घेतलें आहे. १९१७ सालीं ती. काकांची बदली ठाणें येथें मामलेदार म्हणून झाली. चिखली हें गांव बिलीमोरिया स्टेशन-पासून ६ मैल आहे. व आम्ही सर्व मंडळीं ज्यावेळेला ठाण्याला यावयाला निघालों त्यावेळेचा देखावा अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. शेंकडो मंडळी आमच्या टांग्याच्या मागून खिन्न अंतःकरणाने पायीं येत होती. ती. काकांची बदली झाल्या-नंतर पानसुपारी घेण्याची कधींच पद्धत नव्हती. त्यांनीं कधींहि आपल्या गळ्यांत हार घालून घेतला नाहीं. कोणी हार घालावयाला आलें कीं तो हार बाबांना घाला असें ते सागांवयाचे; आमच्या मागून येणाऱ्या त्या लोकांची खिन्न अंतःकरणें व साश्रू नयन ही आमच्या ती. काकांच्या लोकप्रियतेची तंतोतंत साक्ष देत असत. ती. काकांनीं खाली उतरावें व लोकांना परत जा म्हणून सांगावें असें तीनचार वेळां झालें. जवळ जवळ २—३ मैलपर्यंत लोक येत होते.

१९१७ सालीं आम्हीं सर्व ठाण्याला रहावयास आलों. आम्ही ज्या घरांत रहात होतों तें घर एका कोळ्याचें होतें. त्याला तें विकावयाचें होतें. म्हणून त्यांनीं ती. काकांना विचारलें. ती. काकांची त्यावेळेला १०-११ वर्षांची नोकरी व्हावयाची होती त्यामुळें त्यांनीं स्वतःला तें घर घेतलें नाहीं. परंतु दहाहजार रुपये फंड जमवून त्यांतील ४००० रु. स तें घर विकत घेऊन व बाकीचे ६००० सहाहजार रु. रोख असे ठाणें येथील सुप्रसिद्ध मराठी ग्रंथसंग्रहालयाला दिले; पुढें कांहीं वर्षांनी, मराठी ग्रंथसंग्रहालयानें ती इमारत ब्राह्मणसभेला विकली. व १९३० सालापासून तें घर आतां ब्राह्मणसभेच्या मालकीचें आहे. त्या घरांत आतां ब्राह्मणसभेनें पुष्कळच चांगली सुधारणा केली आहे.

१९२३ पासून १९२९ पर्यंत ती. काका कुर्ल्याला फर्स्ट क्लास रेसिडेंट मॅजिस्ट्रेट म्हणून काम करीत होते; त्या दरम्यान तेथेंही जवळजवळ दहा हजार रुपये जमवून त्यांनीं शिरवळ येथें गुरुवर्य बुवासाहेब मोने यांचे जें श्रीएकमुखी दत्ताचें मंदिर आहे तें अगदीं जीर्ण होतें, त्या देवळाचा जीर्णोद्धार केला व आतां तें एक चांगलें प्रशस्त असें मंदिर झालें. आमचे आजोबा कै. ती. नाना ह्यांनाही त्या काळांत खूप मान होता. कै. ती. नानांनाही आपल्याला सद्गुरूंची संगति घडावी अशी मनापासून इच्छा होती. एकदां त्यांना स्वप्नांत एक संत पुरुष दिसले व ते त्यांना म्हणाले, 'मी तुझ्याकडे लवकरच व दरवर्षी चार महिने तुझ्या

संगतींत राहीन, असें कांहीं वर्षें मी करीन.' हें स्वप्न पडल्यानंतर कांहीं दिवसांनीं कै. ती. नाना पूजा वैश्वदेव आटोपून काकबली टाकावयाला बाहेर अंगणांत आले होते त्यावेळेला त्यांना अंगणांत एका झाडाजवळ एक तेजस्वी पुरुष दिसले. दोघांची दृष्टादृष्ट झाल्यावर त्या सत्पुरुषांनीं विचारलें, 'मला ओळखलें कां!' कै. ती. नानांनीं थोडा वेळ विचार केला व स्वप्नांत दिसलेली मूर्ति ती हीच अशी त्यांची खात्री झाली व त्यांनीं उत्तर दिलें होय, ओळख पटली. लगेच त्यांना आदरानें घरांत घेण्यांत आलें व ते पूर्वी सांगितल्याप्रमाणें चार महिने आमच्या घरीं राहिले. असे कांहीं वर्षें ते चातुर्मासांत आले व एका वेळेला त्यांनीं सांगितलें कीं, 'नाना आतां आपली संगती संपली. ह्याच्यापुढें आतां आपला योग नाहीं. मी पुन्हां येणार नाहीं' व त्यानंतर ते पुन्हां आले नाहींत. या सज्जनांचें नांव बुवासाहेब मोने; यांचें हें शिरवळ येथील श्रीदत्त मंदिर. सध्यां तेथें वे. शा. सं. दत्तात्रेय पांडुरंग उर्फ बगोबा मोने आहेत. ही वरील सर्व हकीगत कै. ती. काकांनी आपल्या सहजसुंदर भाषेंत मागें श्रीसाईलीलेंत वर्णन केलेली आहे. श्री बुवासाहेबांचें व कै. ती. नानांचे वेदान्तावर भाषण सदोदित चालू असे व कधीं ते दोघे रात्रभरही बोलत असत.

कै. ती. काका सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनीं बाबांच्या सेवेशिवाय आपणांस दुसरा कोठलाही उद्योग ठेविला नाहीं. चिंचणीचे एक बाबांचे भक्त कै. दामोदर घनःश्याम उर्फ अण्णा बाबरे उर्फ चिंचणकर यांनीं त्यांच्या मृत्युपत्रान्वयें त्यांची चिंचणी येथील सर्व मिळकत बाबांचे चरणीं अर्पण केली. पण त्यांनीं ज्यावेळेला मृत्युपत्र केलें व ज्यावेळेला त्या भाविक पतिपत्नींनीं देह ठेविला त्यावेळेला त्या इस्टेटीवर पुष्कळच कर्जें होतीं व म्हणून मृत्युपत्रान्वयें घेतलेले विश्वस्त हे त्या जमिनीचा कबजा अगर व्यवस्था घेण्यास नाखूष होते, व ती इस्टेट कोर्टाकडे होती. शिर्डीच्या कमिटीला वाटे कीं, हा पांढरा हत्ती आपल्याकडे नको. पण बाबांनीं कै. ती. काकांना प्रेरणा केली व कै. ती. काकांनीं कै. श्री. अण्णासाहेब दाभोळकर, कै. नरसीलालशेट चिंचणी, श्री. रा. ज. उर्फ तात्यासाहेब करंदीकर डहाणू, श्री. कै. र. भा. उर्फ दादा पुरंदरे यांच्या मदतीनें या इस्टेटीची व्यवस्था हातांत घेऊन ती यशस्वी करून दाखविली. ह्याबद्दलचीही सर्व हकीकत कै. ती. काकांनीं वेळोवेळीं श्रीसाईलीलेंत आपल्या सहजरम्य व सविस्तर भाषेंत वर्णन केली आहेच. कै. ती. काकांच्या निधनानंतर चिंचणीची जी कांहीं व्यवस्था करण्यांत आली आहे त्याबद्दलचीही हकीकत श्रीसाईलीलेंत याच अंकांत प्रसिद्ध होत आहे अगर पुढें होईल. कै. ती. काकांना चिंचणी येथें जे श्रीसाई शिवमंदिर बांधावयाचें होतें व तें आतां बांधून झालें आहे. त्यांत बसविण्याकरितां लागणारी श्रीसाईमूर्ति, हल्लीं इसलामपूर येथें असलेले व पूर्वी

पुणें येथें उत्कृष्ट रांगोळी कलाकार म्हणन प्रसिद्धि पावलेले जन्मजात कलावंत श्री. वासुदेवराव आठल्ये यांचेकडून श्रीसांईची संगमरवरी मूर्ति, शिवपिंडी, नंदी, कासव व कै. अण्णा चिंचणकर या पतीपत्नीचीं तैलचित्रें, तयार करवून घेतली होती. ह्या सर्व मूर्ति व हें श्रीसाईशिव मंदिर साईभक्तांनीं चिंचणीला जाऊन जरूर बघून यावें अशी माझी साईभक्तांना नम्र पण आग्रहाची विनंती आहे. चिंचणी येथें जाणेस बी. बी. सी. आय्. रेल्वेवरील बोईसर अगर वाणगांव ह्या स्टेशनवर उतरावें लागतें. दोन्ही स्टेशनावरून दर गाडीच्या वेळेला एक मोटार जाते, टांगेही मिळूं शकतात. त्यांतल्या त्यांत बोईसर स्टेशन ज्यास्त सोयीस्कर.

वर जें मीं दत्तमंदिराच्या जीर्णोद्धाराबद्दल लिहिलें आहे त्या कामांत डहाणूचे श्री. रा. ज. उर्फ राभाऊ करंदीकर, अभ्यंकर रेनर, श्री. कै. सखारामपंत ओपें (पुण्याचे), श्री. कै. जोशी ओव्हरसीयर (ठाण्याचे), श्री. कै. रघुवीर भास्कर पुरंदरे यांची फारच मनःपूर्वक मदत झाली; प्रत्यक्ष देऊळ बांधण्याचें काम डहाणू येथील गोपाळ मिस्त्री यांनीं करून दिलें आहे. हें मंदिर पुणें सातारा-रोडवरील शिरवळ या गांवीं मोटार स्टँडपासून सुमारें १ मैलभर लांब आहे. हेंही स्थान रम्य आहे व ज्यांनीं शक्य असेल त्यांनीं तेथें जरूर जाऊन यावें अशी नम्र पण आग्रहाची विनंती आहे. ह्या मंदिरांत दर वर्षी श्रीदत्तजयंतीचा उत्सव होत असतो व ह्या उत्सवांत लावण्याकरितां म्हणून कै. ती. काकांनीं श्रीदत्तजन्माख्यान म्हणून एक सुंदर कीर्तन केलें आहे. तेंहि श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध झालें आहे. येथील मंदिराचें वैशिष्ट्य म्हणजे तेथें असलेली एकमुखी श्रीदत्तमूर्ति हें होय.

ती. काका हे शिर्डीला नेहेमीं जात असत व तेथें गेले म्हणजे दोन दोन तीन तीन महिने राहत असत. तेथें असले म्हणजे त्यांना सदोदित ध्यास श्रीसाई-पूजेचा व त्या संस्थानच्या उत्कर्षाचाच. त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं कै. अण्णा चिंचणकरांच्या मिळकतीच्या उत्पन्नांतून चावडी बांधली व त्याला त्यांचे म्हणजे चिंचणकर पतीपत्नींचें नांव दिलें आहे. ती. काकांच्या समाजसेवेचा मोठा विशेष हा होता कीं, त्यांनीं आपलें स्वतःचें नांवाची कधींही प्रसिद्धी केली नाहीं अगर त्याबद्दल मनांत अपेक्षाही केली नाहीं. आपल्याला योग्य दिसेल तें कर्तव्य म्हणून करीत रहावयाचें हा त्यांच्या आयुष्यांतील सिद्धान्त होता. दुसरी गोष्ट शिर्डीला जी त्यांनीं सुरू केली ती म्हणजे पुण्यतिथी उत्सवांत आराधना विधी करण्याची. आराधना विधी हा पुण्य साधुसंतांच्या बाबतींत करण्याचा श्राद्धासारखा विधी असतो. हा आराधना विधी अजून दरवर्षी करण्यांत येतो. ती. काकांच्या पश्चात् हा कै. ती. रघुवीर उर्फ दादा पुरंदरे करीत असत. ह्यावर्षी कै. ती. दादांच्या पश्चात् हा आराधना विधी करण्याचें भाग्य मला श्रीसाईकृपेनें लाभलें होतें. तिसरी गोष्ट म्हणजे

पूर्वी पुण्यतिथीच्या दिवशीं जें कीर्तन होत असे त्या कीर्तनाला कोठलेंतरी एखादें आख्यान लावून तें साजरें केलें जात असे. परंतु ही गोष्ट ती. काकांना अनुचित वाटली. कारण असें, श्रीरामनवमीच्या दिवशीं श्रीरामजन्माख्यान, श्रीकृष्ण जन्माच्या दिवशीं श्रीकृष्णजन्माख्यान, त्याचप्रमाणें श्रीसाईच्या पुण्यतिथीच्या दिवशीं त्यांचेंच आख्यान असावें व असलें पाहिजे. म्हणून त्यांनीं पुण्यतिथी आख्यान तयार केलें व तें स्वतः त्या दिवशीं करण्याची प्रथा नवीनच पण अत्यंत जरुरीची अशी सुरू केली. तें आख्यान ज्यावेळेला पहिल्याप्रथम शिर्डी येथें लावण्यांत आलें त्यावेळेला तेथें हजर असण्याचें भाग्य मला लाभलें होतें व दहा वाजल्यापासून बरोबर दुपारीं दोन वाजेपर्यंत चाललें होतें. सर्व श्रोतृवृंद खरोखरच ती. काकांच्या अत्यंत सुरस अशा सांगण्याच्या कौशल्यामुळें व सहजमनोहर अशा त्यांनींच केलेल्या प्रसादयुक्त अशा पद्यामुळें अगदीं तल्लीन होऊन गेला होता. त्यानंतर एकदां आमचे मित्र, भजनरंगांत दंग होणारे श्री. शांतारामभाऊ तेलंग यांच्या गाण्याच्या साथीचा योग तेथें आला होता. त्याही वेळेला कीर्तनाला चांगलाच रंग आला होता.

शिर्डीला असणाऱ्या सर्व सामानाची व्यवस्थित यादी करणें व संस्थानच्या इतर कामाला चांगलें योग्य व शिस्तशीर वळण लावण्याचें काम ती. काकांनीं केलें. अशीं पुष्कळच कामें त्यांनीं केलीं.

ती. काकांना श्री. साईमहाराजांचें दर्शन दि. ३० नोव्हेंबर १९१० या दिवशीं, श्री. नानासाहेब चांदोरकर यांच्याकडून कळविलेल्या माहितीप्रमाणें घडलें याबद्दलची सर्वसुंदर हकीकत आपल्या सहजरम्य भाषेंत ती. काकांनीं श्रीसाई लीलेच्या ३ ऱ्या वर्षाच्या ६ व्या अंकांत पान २४९ ते २५९ वर लिहिलेली प्रसिद्ध झाली आहे व सबब त्याची पुनरुक्ति करणें योग्य होणार नाहीं. त्यांना स्वतःला आलेले दुसरे दोन अनुभव श्रीसाई सच्चरित् अध्याय ४० व ४१ यांत प्रसिद्ध झाले आहेत; पण ती. काकांचें श्रेष्ठ भक्तिमत्व दाखविणारा दुसरा एक अनुभव आहे. एकदां श्री. नानासाहेब चांदोरकरांना बाबांनीं दुपारीं पुरणाची पोळी करून नैवेद्य आणावयास सांगितलें याबद्दलचा अनुभव मागें श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध झाला आहे पण त्याच्या पुढील भाग प्रसिद्ध झाला नाहीं. श्री. नानासाहेबांनीं मोठ्या शिकस्तीनें पुरण पोळीचा नैवेद्य करून नेला व बाबांनी तो खाण्याचा नाकारला. बाबा म्हणाले मी खाल्ला आहे. त्यावर बाबांनीं श्री. नानासाहेबांना पुष्कळ उपदेश केला व सांगितलें कीं ते कोणत्याही रूपानें कोठेंही केव्हांही खाऊं शकतात. श्री. नानासाहेब म्हणाले, "बाबा, हें अगदीं

कबूल आहे. परंतु आम्ही अज्ञ मानव, आम्हांला तुम्ही अमक्या रूपानें येऊन खाल्लेंत हें कसें समजावयाचें.' या प्रश्नावर बाबांनीं त्यांना सांगितले कीं अशी एक खूण असतें कीं ती खूण तुला जेथें दिसेल तेथें दैवी अंश आहे असें समजत जा. पण ही गोष्ट तूं या भक्तांच्याशिवाय कोणालाही सांगू नकोस व बाबांनीं ३–४ भक्तांचीं नांवें सांगितलीं होतीं व त्या भक्तांत आमच्या परमपूज्य ती. काकांचें नांव होतें. पण दुर्दैवानें या प्रकरानंतर स्वस्थपणानें ती. काकांची व श्री. नानासाहेबांची गांठ पडली नाहीं व हें गुप्त त्यांच्याच जवळ राहिलें.

ती. काकांनीं १९२३ सालीं, मोठ्या आई ( म्हणजे त्यांची आई ), आमची आई, आम्ही दोघे भाऊ, आमच्या आईच्या काकू मथुराकाकू, आमच्या आत्याबाई मथुआत्याबाई, त्यांचे चिरंजीव मोरोपंत पंडित व त्यांच्या पत्नी सौ. शारदाबाई व त्यांचा लहान मुलगा कांता इतक्या मंडळीसह काशीयात्रा केली. याच मथुअत्याबाईकडे ती. काकांचें थोडेसें इंग्रजी शिक्षण झालें. तरी ती. काकांच्या मनांत त्यांच्याविषयीं अतिशय पूज्य बुद्धि व कृतज्ञता बुद्धि असे व त्याकरितां या सर्व मंडळींना त्यांनीं आपल्याबरोबर नेलें होतें. आम्ही, अलाहाबाद म्हणजे प्रयाग, काशी, गया, अयोध्या, दिल्ली, मथुरा, आग्रा, वृंदावन, हरिद्वार, लक्ष्मणझूला, कोल्हापूर, नरसोबाची वाडी, ओंकारेश्वर, ममलेश्वर, उज्जयिनी, शिर्डी वगैरे ठिकाणी जाऊन आलों. काशी क्षेत्राच्या ठिकाणीं आमचा मुक्काम एक महिनाभर झाला. कारण तेथें ती. काका आजारीं झाले होते. बरेच आजारी होते. औषध वैद्यांचें होतें; श्रीविश्वेश्वरावर मृत्युंजयाचा अभिषेकही केला व सर्वांचें भाग्य म्हणूनच ते त्यावेळेच्या आजारांतून बरे झाले. असो.

१९२५ सालीं आमच्या घरांतील मंडळी व इतर मंडळी मिळून जवळजवळ ४० मंडळी द्वारकेला गेलों होतों. त्यावेळेला बेट द्वारका, सोरटी सोमनाथ, ह्या ठिकाणीं जाऊन आलों. ह्या यात्रेंत, वेळ सांपडला कीं ती. काकांचें श्रीज्ञानेश्वरी वाचन चाले. श्रीज्ञानेश्वरी वाचण्याची आज्ञा बाबांनीं त्यांना कशी दिली हें श्रीसाई सच्चरित्रांत आहेच.

ह्यानंतर आमच्या ती. मोठ्या आई वारल्या म्हणून १९२६ सालीं आम्ही सर्व मंडळी सिद्धपूर उर्फ मातृगयेला गेलों होतों. त्यावेळेच्या प्रवासाबद्दलची हकीकत श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध झाली आहे.

१९२९ सालीं ती. काका सेवानिवृत्त झाले. त्यानंतर ती. रघुवीर उर्फ दादा पुरंदरे यांच्याबरोबर आमची बहीण खंभालियाला स्त्रीवैद्य असल्याकारणानें, ती. काका, ती. सौ. आई हीं द्वारकेला, बेट द्वारकेला ४-५ वेळां जाऊन आली. त्याचप्रमाणें गिरनार व सोरटी सोमनाथ या क्षेत्रांचेंही दर्शन घेण्याची सुसंधी त्यांना लाभली.

ती. काकांचा दररोजचा कार्यक्रम अगदीं ठराविक व मोजका असे. बाबांनीं आज्ञा दिल्यापासून श्रीज्ञानेश्वरी वाचन त्यांनीं कधीं चुकविलें नाहीं. आजारपणांत सुद्धां श्रीज्ञानेश्वरी प्रत त्यांच्या उशाला असे व त्यांना जेव्हां ज्ञानेश्वरी वाचणें अशक्य होई त्यावेळेला आम्हा मुलांच्याकडून वाचून घेत असत. बाबांची पूजा सकाळ व संध्याकाळीं कमींत कमी १ ते २ तास चाले. सेवानिवृत्त झाल्यानंतर बाबांची पूजा व श्रीज्ञानेश्वरी वाचन वाढलें. त्यांनीं कधीं नोकरीवर असतांना वरिष्ठांची वरच्या जागेकरितां हांजी हांजी केली नाहीं व आपल्याला योग्य वाटेल तो न्याय देण्यास कधीं कमी केलें नाहीं. ती. काका रोज दोन वेळां सकाळीं व संध्याकाळीं स्नान गार पाण्यानें करीत असत. दोन जेवणाच्यामध्यें ते कांहीं घेत नसत. रात्रीच्या जेवणानंतर निजतांना फक्त दूध घेत असत. सकाळीं उठल्यानंतर ते ती. मोठ्या आत्याबाई असत त्यांना प्रणाम करीत असत. एकदां त्यांनीं आम्हांला तीन नियम करावयास सांगितले. ते नियम ते स्वतः तर पाळीतच असत. हे नियम म्हणजे ( १ ) आंघोळीच्या अगोदर कांहीं खावयाचें नाहीं. ( २ ) पानांत कांहीं टाकावयाचें नाहीं. ( ३ ) आंघोळ झाल्यानंतर आपलें जें पूज्य दैवत त्याला कांहीं फूल ना पाकळी वाहिल्याशिवाय अन्नग्रहण करूं नये. त्यांना कोठलेंही व्यसन नव्हतें. नाटक सिनेमा हा त्यांनीं खरोखर आमच्यादेखत कधींही बघितला नाहीं. एकदां आम्हीच त्यांना आमच्या आत्याबाईंना मध्यस्थी घालून 'संत तुळशीदास व संत ज्ञानेश्वर' या सिनेमांना नेलें होतें. परंतु ते सुद्धां त्यांनीं पुरते पाहिले नाहींत. त्यांना त्रास होऊं लागला. ते व मी बाहेर हवेवर येऊन बसलों. त्यांची वागण्याची पद्धत म्हणजे त्यांच्यापासून कोणालाही त्रास होणार नाहीं. त्यांनीं तर आम्हां मुलांना अगर इतरांना कधीं मारलें तर नाहींच पण दुसऱ्यांनाही कधीं मारूं दिलें नाहीं. कधीं रागेंही भरत नसत. तरीपण सर्वांना त्यांच्याविषयीं आदरयुक्त भीति वाटे. त्यांचें स्वतःचें वर्तनच आमच्यासमोर नेहमीं आदर्श होतें व अजूनही आहेच. आमच्या दुर्दैवानें त्यांच्या श्रीज्ञानेश्वरी वाचन श्रवणाचा लाभ आम्ही घेतला नाहीं. आमच्या मोठ्या आत्याबाईंचें ज्यावेळेला प्राणोत्क्रमण झालें त्यावेळेला आमची ती. सौ. आई कल्याणला गेली होती. त्यामुळें

पुढील विधीला वेळ लागला. दरम्यान ३-४ तास गेले. परंतु तेवढ्या अवधींत ते श्रीज्ञानेश्वरीचें पुस्तक घेऊन त्यांच्या उशाशीं वाचीत बसले होते! त्यांचे स्वतःचें शिक्षण दुसऱ्यांच्या घरीं झालें असल्यानें त्यांना विद्यार्जन करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांची फार दया येत असे व यामुळें जे जे विद्यार्थी आमच्याकडे मदतीच्या दृष्टीनें आले त्यांना त्यांना आमच्या ती. काकांनीं सढळ हातानें मदत केली. त्यांना घरीं ठेवून घेतलें व त्यांची विद्या केली. अशा विद्यार्थ्यांच्या पैकीं एक रा. अनंतराव फडके, रेंज फॉरेस्ट ऑफिसर हल्ली पुणें व सातारा या जिल्ह्याच्या करितां स्पेशल लँड डेवलपमेंट ऑफिसर आहेत यांचें नांव घेतां येईल. हे आमच्या ती. काकांच्या मित्रांचे चिरंजीव. हे व यांचे दोघे भाऊ आमच्याकडे रहावयाला व शिकावयला असत. रा. अनंतराव यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण आमच्याकडे झालें. त्याचप्रमाणें आमचे चुलत बंधु रा. वसंतराव देव यांचेंहि मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण आमच्याकडे झालें. सध्यां ते संगमनेर येथें गुरांचे डॉक्टर असून हल्लीं सरकारमार्फत संशोधन खात्यांत अभ्यास करण्याकरितां मुलेश्वरला गेले आहेत. अशीं एक ना दोन पुष्कळ उदाहरणें देतां येतील. कुटुंबाचे मुदतीच्या कायद्याच्या बाहेर गेलेलें कर्ज देण्याचें यांनी कबूल केलें व सुरवातीला जरी नोकरींत ३० रु. पगारावर काम करीत होते तरी त्यांतून शिल्लक टाकून वर्षाला १०० रु. याप्रमाणें ४० वर्षें हप्ते दिले; आमच्या चुलत्यांनीं कित्येक वर्षांपूर्वी घेतलेले आमच्या एका आत्याबाईचे मुदतीबाहेरचे पैसेहि देऊन टाकण्याची सर्व तयारी झाली होती. परंतु दुर्दैवानें कालाचा घाला त्यांच्यावर आला. परंतु त्यांची इच्छा त्यांच्याच आशीर्वादानें व श्रीसांईकृपाप्रसादानें त्यांच्या निधनानंतरहि पुरी केली गेली. आमच्या ती. काकांची मनोभावानें सेवा आमच्या ती. सौ. आईनें शेवटपर्यंत केली; ६० वर्षेंपर्यंत अत्यंत एकोप्यानें या जोड्यानें आपलें आयुष्य व्यतीत केलें.

ती. काकांचा संस्कृत विषय फार चांगला असे. त्याना संस्कृतमध्यें व मराठीमध्यें कविता करण्याचा नाद असे. परंतु या सर्व कविता अगर लेख हे सर्व श्री साईबाबांच्या वरच केलेले. त्यांच्या कविता प्रेमळ, रसाळ, साध्या व सहजसुंदर आहेत. त्यांचे लेख 'बाबांचें बाळ' या नांवाखालीं श्री. साईलीलेंत पूर्वी पुष्कळ प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या संस्कृत व मराठी कविताही पुष्कळ प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याच्यापैकीं एक गुरुप्रसाद याचनादशक हें हल्लीं श्री शिर्डीस संध्याकाळच्या आरतीच्या वेळेला म्हटलें जातें. श्री. सांईसच्चरित कै. आण्णासाहेब दाभोळकर यानीं श्रीबाबांच्या सांगण्यावरून लिहिण्यास सुरवात केली व त्यांचें ५२ अध्याय पुरे झाले. व एकाएकीं ती. अण्णासाहेबांना बाबांच्या दरबारचें बोलावणें आलें. इतका सुंदर ग्रंथ व जवळजवळ संपत आलेला परंतु अवतरणिका नाहीं म्हणून छापून ग्रंथरूपानें प्रसिद्ध करतां येईना. तेव्हां श्री. बाबासाहेब तर्खड यानीं आमच्या ती.

काकांना ती कामगिरी सांगितली व श्रीबाबांच्या प्रेरणेनें व कृपाप्रसादानें बाकीच्या ग्रंथाला साजेल अशी अवतरणिका तयार झाली. त्या ग्रंथाला ती. काकांनीं विस्तृत लिहिलेली एक प्रस्तावना आहे.

पहिल्या प्रथम संस्थानचा खर्च दांडगा व उत्पन्न मात्र कांहीं नाहीं. तेव्हां आमच्या ती. काकांनीं कल्पना काढली कीं, असे १०० भक्त काढावयाचे कीं जे १००० रु. श्रीबाबांच्या कायम फंडाला देतील व अशा रीतीनें १०० भक्त मिळाले कीं एक लाख रुपये होतील व त्याच्या व्याजामधून तेथील सर्व खर्च बिनबोभाट चालेल. ललितकलादर्श मंडळीचे उत्साही आमचे नातेवाईक मालक कै. व्यंकटराव पेंढारकर यांना विनंती करून आमच्या ती. काकांनीं दोन खेळ घेतले व ते म्हणाले, ‘ राक्षसी महत्वाकांक्षा ’ व ‘ सत्तेचे गुलाम.’ दोन्ही खेळाचें उत्पन्न २८०० रु. झालें व इतक्या पैशांची प्राप्ती संस्थानला एकदम झाली. अशा रीतीनें त्यावेळच्या भक्तांनीं अंगमेहनतीनें संस्थानला भरभराटीला आणण्याला मदत केली आहे. आतां लाखाच्या ऐवजीं चार लाख रुपये संस्थानजवळ आहेत. व दुसऱ्या भक्तांच्या सोयीकरितां पुष्कळ इमारतीही बांधल्या गेल्या. ती. काकांचें शिर्डीबद्दलचें जें स्वप्न होतें तें बरेचसें प्रत्यक्षांत आतां येत चाललें आहे.) ती. काकांचें मराठी, मोडी व इंग्रजी अक्षर फारच सुंदर वळणदार असे.

ती. काकांची शरीरप्रकृति मूळची व्यायामानें चांगली कमावलेली होती. ते नेहमीं पूजेच्या वेळीं प्राणायाम करीत असत. अलीकडे २५ वर्षे त्यांचा एक पाय सुजून त्यांना ताप येत असे. व ताप आला म्हणजे तो २ दिवस रहात असे. पण त्यांनीं आजारीपणांत कधींच कोणाचें–डॉक्टरांचें अगर वैद्याचें औषध घेतलें नाहीं. ते नेहमीं लंघन करीत असत. आम्हांला रहावत नसे म्हणून आम्ही आमच्या सदैव उपयोगी पडणारे आमचे मावस बंधु डॉ. भाऊसाहेब ढवळे एम्. बी. बी. एस्. यांना बोलावीत असूं; आमच्या मोठ्या आत्याबाई ज्या बरींच वर्षे आमच्याकडे असत, व ज्यांचा आमच्या ती. काकांच्यावर फार लोभ होता, त्या १९४५ सालच्या भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवसापासून अर्धांगाच्या झटक्यानें आजारी पडल्या व ४ दिवसांनंतर त्यांचे आमच्या येथेंच प्राणोत्क्रमण झालें. त्या शिर्डी संस्थानच्या आजीव सभासद होत्या. ह्या आत्याबाई गेल्या म्हणून आमच्या पुण्याच्या दुसऱ्या आत्याबाई–ज्यांच्याकडे लहानपणीं आमचे ती. काका शिकावयास होते–त्या आमच्या ती. काकांना भेटावयाला आल्या. १५ एक दिवस त्या आनंदांत होत्या व बंधूभगिनींच्या मोठ्या प्रेमाच्या गोष्टी चालत. पण दैवदुर्विलास असा कीं, नंतर ह्या आमच्या आत्याबाई आजारी पडल्या व कांहीं दिवसांनंतर

त्यांनींही आमच्याच घरांत देह ठेविला ! ही साधारण दुपारची गोष्ट. मीं ती. काकांच्या सांगण्याप्रमाणें त्यांच्या चिरंजिवांना म्हणजे आमच्या आतेभावांना तार केली होती. तेव्हां ते येईपर्यंत आम्हांला थांबणें भाग होतें. ती. काका इतका सर्व वेळ ज्ञानेश्वरी वाचीत त्यांच्या उशाशीं बसले होते. त्या गेल्यानंतर ती. काकांच्या मनावर परिणाम होईल अशी मला कल्पना होती व त्याप्रमाणेंच तिसरेच दिवशीं सकाळीं मला त्यांनीं हांक मारली व ती. सौ. आईस बोलवावयास सांगितलें. थोड्या वेळानें ते एकदम घाबरले व ती. सौ. आईनें मला व आमचे आतेभाऊ ती. मोरुतात्या पंडित यांना खोलींत बोलाविलें. मीं आमचा पुतण्या चि. भास्कर यांस डॉक्टरना आणावयास धाडलें. पण ती. काका लगेच सावध झाले व मला एका हाताशीं व ती. मोरुतात्यांना दुसऱ्या हाताशीं त्यांनीं धरलें व सांगितलें कीं, " माझी प्रत्यक्ष जन्म देणारी आई गेली त्यावेळीं मला इतकें वाईट वाटलें नाहीं. पण ही मात्र माझी खरी आई गेली. " इतकें बोलून त्यांना जो शोकाचा उमाळा आला तो त्यांना कांहीं आवरेना व त्यांतच त्यांना धास्तीचें परसाकडे सुरू झालें. आमचे बंधु डॉ. श्रीनिवासराव देव व भगिनी डॉ. जानकीबाई ही सर्व मंडळी खंभालियाला होती. आमच्या चुलत वहिनी चि. सौ. मालतीबाई व त्यांचीं मुलें ( चि. वसंत-रावांचें कुटुंब ) हीही तेथेंच होती. ह्या सर्व मंडळींना तार करून बोलाविलें. ही मंडळी शुक्रवारीं परत आली. आमच्या बंधूंचा धाकटा नुक्ताच झालेला गोडसा मुलगा चि. माधव याचा ती. काकांना फार लळा होता. दिवसेंदिवस प्रकृती जास्त बिघडतच चालली व आमचे मावस बंधू डॉ.भाऊसाहेब ढवळे, बंधू डॉ. श्रीनिवासराव व भगिनी डॉ. जानकीबाई यांच्या प्रामाणिक अत्यंत प्रयत्नांनाही यश येण्याचें चिन्ह दिसेना. काय हवें असें एकदां विचारलें त्यावेळेला त्यांनीं काशीची गंगा आणून दे म्हणून सांगितलें. त्यावेळेला आमच्या शेजारच्या वैद्यांची मंडळी काशीयात्रेला जाऊन आली होती त्यांच्याकडून गंगा आणून दिली. बाबांची उदी दररोज देत होतोंच. अशा रीतीनें सोमवारीं रात्रीं १० च्या सुमाराला ते एकदम घाबरल्यासारखे झाले; व डोळे त्यांनीं कसेतरीच फिरविले. त्यावेळेला मी एकदम रडावयास लागलों व म्हणालों, 'काका, आमच्यावर रागावलांत कां ! तुम्ही आम्हाला कां सोडून जातां !' १–२ मिनिटें अगदीं स्तब्धता व नंतर सावकाशपणें त्यांनीं डोळें उघडले व मला म्हणाले, 'बाळा, मी कोणावरही रागावलों नाहीं. पण मला झोंप येत आहे. तुम्ही सर्व-जण आतां येथून जा. मला आतां स्वस्थ झोंप घेऊन द्या.' हेंच आमच्या अत्यंत प्रेमळ पितृदेवांचे शेवटचे शब्द ! आम्ही सर्वजण त्यांच्या सभोंवतीच होतों. साधा-रण ४ तास त्यापुढें त्यांचा नश्वरदेह ह्या पृथ्वीवर होता व १।।। च्या सुमारास ते श्री साईचरणीं लीन झाले ! व आमचा सर्वस्वी आधार तुटला, छत्र हिरावलें गेलें ! श्रीसाईचरणीं त्यांचा नक्की वास आहेच. कारण मागील अंकांत सांगितल्याप्रमाणें त्यांच्या वाणीची सत्यता अजून प्रत्ययास येत आहे ! व त्यामुळें अशी खात्री झाली आहे

कीं, ती. काकांना श्रीसांईचरणीं आधार मिळालेला आहे ! परंतु आम्हांला मात्र त्यांचा सद्गुणी सहवास चुकला व अंतरला. आमचे ती. काका म्हणजे प्रेमळ पती, उत्तेजन देणारे धीराचे सद्गुणी, सदाचारी, निर्व्यसनी, पुण्यशील, आदर्शभूत पिता, सर्व नातेवाइकांना भक्कम आधार, व परोपकारी वगैरे किती तरी गुणांचे समुदाय होते व त्यामुळें त्यांच्या मृत्यूनें यमराजानें आम्हां सर्वांचें अपरिमित नुकसान केलें ! म्हणून रघुवंशांत कालिदासानें म्हटल्याप्रमाणें त्या महाकवीच्या शब्दांत, ती. काकांना नेण्यांत त्यानें काय काय आमचें नेले नाहीं असें यमराजांना विचारावेसें वाटतें.

करुणाविमुखेन मृत्युना हरता तं वद किंतनो हृतम् ॥

ती. काकांच्या निधनानंतर शिर्डीसंस्थान कमिटीनें जो ठराव केला तो खालील प्रमाणें:—

" ही सभा नमूद करतें कीं, श्री. बाळासाहेब देव यांनीं शिर्डी संस्थानचे विश्वस्त या नात्यानें गेली १५ – १६ वर्षें जी अव्याहत सेवा केली, तसेंच कै. चिंचणकर ट्रस्टच्या इस्टेटीची व्यवस्था पाहून संस्थानास सालीना सुमारे ७००–८०० रुपयांचें उत्पन्नाचा लाभ करून दिला व अशा रीतीनें संस्थानास कायमचें ऋणी करून ठेविलें आहे त्याबद्दल सभा त्यांची अत्यंत आभारी आहे. या सेवेच्या प्रीत्यर्थ त्यांच्या आत्म्यास पूर्ण शांति देवोत अशी श्रीचें चरणीं प्रार्थना आहे."

ती. काकांच्या नंतर अवघ्या थोड्याच दिवसांत ती. आईही आम्हाला सोडून गेली व अशा रीतीनें आम्ही पितृछायेला व मातृछायेला व दोघांच्याही मायेला मुकलों ! श्री साईचरणीं आमच्या मातृपितृ देवांना त्यांचे चरणीं निरंतर शांतिसुखांत स्थान देणेंविषयीं विनंती करून व याच पुण्यशील मातापितरांचा लाभ जन्मोजन्मीं होवो अशी प्रार्थना करून हें अल्पचरित्र संपवितों.

आपला नम्र,

**श्रीपाद बाळकृष्ण देव**

# -श्री साईबाबांचा पोवाडा--

## चौक पहिला

धन्य धन्य साऱ्या जगतांत । मृत्यु लोकांत । शिरडी क्षेत्रांत । साई हा परब्रह्म अवतार । जाहला करण्या भक्तउद्धार । असा हा त्रैमूर्ति अवतार ।। जी ।। न माता आणि कोणी पिता । कशाचा न पत्ता । जगाचि माता उकिरड्यावरी येऊनि ठेली । निंबवृक्षाच्या खालीं बैसली । बसुनी हो साधनाच केली ।। धृ० ।। जी ।।

येऊनी अष्ट वर्षांत । तपा आचरीत । तेज झळकत । वैराग्याचा हा पूर्ण पुतळा । बहुत दिन दृष्टीं नाहीं भरला । परी तो पाहे सर्वाला ।। जी० ।। ( चाल ) ईश्वरी योजनाच झाली । सई आजीची दृष्टी हो गेली । विचारपूस तीनें हो केली । परी तपास ना त्या वेळीं ।। होतां होतां चंपाषष्ठीला, । खंडोबा खेळूं लागला ।। जी० ।। गांवकऱ्यांनीं प्रश्न हो केला । ही कोण मूर्ति या स्थळा ।। धृ०।। जी० ।। ( चाल ) खंडोबांनीं हुंकार दिला । करा बाजूला । त्याच मूर्तिला आणि सुरवात खोदण्याला । पत्ता मग कळेल तुम्हांला । हांच ही वाणी सत्त्वाला ।। जी० ।। दुसरे दिवशीं उठून पहांटेला । लोक जमा झाला । निंबाखालीं आला । झाली सुरवात खोदण्याला । पुरुष दीड पुरुष खड्डा केला । जात्याची तळीच हाताला ।। जी० ।। ( चाल ) जात्याची तळी काढून । भुयाराचा शोध लावून । जळत्या समया तेथ पाहून । भयचकीत गेले होऊन । बाबांची वाणी चालली । उठाठेव करूं नका स्थळीं । माझें गुरुस्थान या स्थळीं । बुजवून टाका यावेळीं । खुण तुम्हांस देतों भली । खुण म्हणून हात हा ठेविला खांदीवरी । हाताचा स्पर्श हो झाला । पाला गोड लागूं लागला । बाकी साऱ्या झाडफांदीला । कडू तसाच आहे पाला । ही खूण हल्लीं या स्थळा ।। जी० ।।

## चौक दुसरा

( चाल ) धुप खेड्याचा चांदपाटील । घोडी निघाल्या शोधाया । त्यासी पहाना सवाल दीधला । चिलीम पिऊनी मग जाया ।। जी० ।। चिलीमीसाठीं विस्तव नव्हता । सटका ठोकीला भूमिवरी । सटका ठोकितां चमत्कार पहा । अग्नी निघाला सत्वरीं । चिलीम

संपली वाणी निघाली । जा बघ तेथं तुझी घोडी । पाटील नाल्यावरी पातला । घोडी चरत बहू अति गोडी । घोडी घेऊन पाटील आला । सवाल दिधला बाबाला । घेऊनि जातो देवा तुम्हां । आम्ही आमुचे गांवाला । बाबा गेले धूप खेड्याला । चांदभाई आनंदीत झाला । कांहीं दिवस तेथें राहून । सोयरीक काढली शोधून । तो शोध शिरडीचा आला । वऱ्हाडाचा जमाव केला । वऱ्हाडाच्या संगती राहून । शिरडीस आले परतून । (चाल) म्हाळसापति खंडोबाचे भक्त । पूजा आर्चित । वऱ्हाडा उतरत । भक्ताचे दृष्टीं बाबा पडले । पडतांक्षणीं साईबाबा वदले । हेंच हें नांव जगा हो झालें ॥ जी ॥ परब्रह्म पितासह आई । बाबा हे साई । नांव नवलाई । साईबाबा नामधारणाही । कबीरपंथाची देत ग्वाही । राम आणी रहीम एक पाही ॥ जी ॥ (अपूर्ण)

---

## विनंति

सर्व साइभक्तांनो, साई लीलेचा हा ४ था अंक आहे. तरी पुढील वर्षाची वर्गणी रु. २ आ. ४ लवकरच मॅनेजर शिरडी संस्थान, ह्यांच्याकडे पाठवावी म्हणजे पुडील वर्षाचे अंक पाठविण्यास सोपें जाईल.

७-११-४८ च्या मॅनेजिंग कमेटीच्या सभेंत रा. रा. **खारकर** हें अध्यक्ष पदावर सर्वानुमतें निवडून आले, हें कळविण्यास फार आनंद होत आहे.

'साई लीलेंत' छापण्याकरितां, स्वतःचे अनुभव कविता वगैरे संपादक यांच्याकडे पाठविणें.

---

# श्री· साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

---o---

| | | |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [ मराठी ] | किं. रु. ७–०–० |
| २ | सच्चरित, [ इंग्रजी ] | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी | ०–२–० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [ इंग्रजी ] | १–४–० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वासनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

म्यानेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर.**

श्री. वि. आ. वैद्य मु. चाचडची चाळ, वरसावा रोड, अंधेरी **मुंबई.**

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे

संपादकः– **डॉ. के. भ. गव्हाणकर** यानी, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक:– **के. एन. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस ज्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, **मुंबई ४.**